



# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२९० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १६ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## बांगलादेशातील हिंदूंना वाचवा...; आजीचे किस्से सांगत प्रियांकांचा मोदी सरकारवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ नवी दिल्ली**

प्रियांका गांधी यांनी संसदेत मोदी सरकारला बांगलादेशातील हिंदू, ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याकांना वाचवण्याचे आवाहन केले आहे. त्या म्हणाल्या, आज विजय दिवस आहे. या दिवशी आपण पाकिस्तानला धडा शिकवला आणि बांगलादेशची निर्मिती झाली. इंदिरा गांधींचे निर्णायक सरकार आणि शूर सैनिकांनी हा पराक्रम केला होता. त्यांनी इंदिरा गांधींच्या इच्छाशक्तीचा उल्लेख करत, आपणही बांगलादेशातील



अल्पसंख्याकांचे त्याच पद्धतीन संरक्षण करावे, असे आवाहन मोदी सरकारला केले आहे.

प्रियंका गांधी सोमवारी लोकसभेतील आपल्या दुसऱ्या भाषणात म्हणाल्या, मला पहिला मुद्दा मांडायचा आहे की, या सरकारने बांगलादेशातील हिंदू आणि ख्रिश्चनांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात आवाज उठवला हवा. याच वेळी मला १९७१ च्या युद्धात हौतात्म्य आलेल्या शूरवीरांनाही अभिवादन करायचे आहे. आज मी देशातील जनतेलाही अभिवादन करू इच्छिते. कारण भारताने मिळवलेला विजय त्यांच्याशिवाय अशक्य होता. त्यावेळी आम्ही एकटेच होतो आणि आमच्या बंगाली बांधवांचा आवाज कोणीही ऐकत नव्हते. त्या काळात भारतातील जनता एकत्र आली आणि नेतृत्वाच्या पाठीशी उभी राहिली.

खासदार प्रियांका पुढे म्हणाल्या, मला इंदिरा गांधींना अभिवादन करायचे आहे. त्या या देशाची महान शहीद आहेत. कठीण परिस्थितीतही त्यांनी असे नेतृत्व केले, ज्याने या देशाला विजय मिळवून दिला. ती लढाई तत्त्वांची होती. पहिला मुद्दा म्हणजे बांगलादेशात अल्पसंख्याकांवर होत असलेल्या अत्याचारांवर सरकारने आवाज उठवायला हवा.

### आज तो फटोही काढण्यात आला

प्रियांका पुढे म्हणाल्या, आज सैन्य मुख्यालयातून पाकिस्तानी सैन्याचे सरेंडर दाखवण्यात आलेला फोटोही काढण्यात आला आहे. पाकिस्तानच्या ९३ हजार सैनिकांनी भारतीय सैन्य शक्तीपुढे शस्त्रास्त्रे टाकली होती. त्या आत्मसमर्पणाच्या फटोच्या उल्लेखाने आजही पाकिस्तानचा तिळपापड उडतो.

## आदित्य ठाकरे यांची जोरदार टीका म्हणाले, भाजपाचे दुतोंडी हिंदुत्व पुढे आणले

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १६ मुंबई**

मुंबईतील दादर येथील हनुमान मंदिराचा मुद्दा चांगलाच गाजताना दिसतोय. दादर येथील ८० वर्ष जुन्या हनुमान मंदिराच्या पुजाऱ्यांना आणि विश्वस्तांना सात दिवसांमध्ये मंदिर हटवण्यास सांगण्यात आले होते, तशी नोटीस पाठवण्यात आली. रेल्वेकडून ही नोटीस देण्यात आली होती. काल पत्रकार परिषदेमध्ये उद्धव ठाकरे यांनी भाजपावर सडकून टीका या मुद्दावरून केली. दुसरीकडे आज संध्याकाळी आदित्य ठाकरे यांच्या हस्ते मंदिरात महाआरती केली होणार होती. मात्र, त्यापूर्वीच मंदिराच्या नोटीसला थेट स्थगिती देण्यात आली आणि मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते आरती देखील करण्यात आली.



मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले की, रेल्वेमंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून या नोटीसला स्थगिती देण्यात आलीये. इथे दररोज पूजा केली जाईल. आता नुकताच दादर हनुमान मंदिराच्या विषयावरून आदित्य ठाकरे यांनी जोरदार टीका केलीये. आदित्य ठाकरे म्हणाले की, बांगलादेशात जाऊन हिंदुत्व वाचवा. रेल्वेकडून ही स्थगिती घाई घाईमध्ये दिली. कारण आम्ही तिथे जाऊन साडेपाचला दर्शन घेणार होतो.

मी आज साडेपाचला मंदिरात जाणार आहे. काल आम्ही भाजपाचे दुतोंडी हिंदुत्व आहे ते समोर आणले. निवडणुकीसाठी हिंदुना वापरले जाते. त्यानंतर निवडुका झाल्या की, यांच्याच राज्यात आमची मंदिरे सुरक्षेत नसतात, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले. मुंबईतील रस्ते घोटाळ्यावर बोलताना देखील आदित्य ठाकरे हे दिसले आहेत. अजूनही लहान मुलांना विद्यार्थ्यांना शाळेचे गणवेश दिले नसल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले.

## महायुतीतलं 'ते' १ मंत्रिपद कोणासाठी? चर्चा ऑपरेशन लोटस अन् देवाभाऊंच्या 'ट्युशन टीचर'ची

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार काल संपन्न झाला. नागपुरातील राजभवनात ३९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. त्याआधी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची, एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेली आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाची सदस्यसंख्या ४२ वर पोहोचली आहे. मंत्रिमंडळातील एक खुर्ची अद्याप रिकामी आहे. ती कोणासाठी रिकामी ठेवण्यात आली आहे, या प्रश्नाचं उत्तर अद्याप तरी मिळालेलं नाही. मात्र त्यावरुन विविध तर्क लढवले जात आहेत.

महायुती सरकारमधील एक मंत्रिपद राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासाठी ठेवल्याचा खळबळजनक गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरींनी केला आहे. त्यामुळे उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच झालेल्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात जयंत पाटील यांनी



'योग्य वेळी योग्य निर्णय' असं म्हणत सूचक विधान केलं होतं. तुम्ही प्रतिसादच देत नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार समोरुन म्हणाले होते. त्यावर पाटील यांनी सूचक विधान केलं होतं.

१२ डिसेंबरला दिल्लीत अजित पवारांनी शरद पवारांची सहकुटुंब भेट घेतली. त्या दिवशी शरद पवारांचा वाढदिवस होता. त्या भेटीपासून दोन्ही पवार एकत्र येतील अशी चर्चा सुरु झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आल्यास पक्षाच्या खासदारांचा आकडा थेट ९ वर जातो. त्या जोरावर पक्षाला केंद्रात दोन मंत्रिपदं मिळू शकतात. विशेष म्हणजे ही बेरीज शिंदेंच्या शिवसेनेची बार्गेनिंग पॉवर कमी करणारी ठरते. कारण सेनेचे ७ खासदार आहेत.

जयंत पाटील यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चांगले संबंध आहेत. राज्यात आघाडीचं सरकार असताना, युती विरोधात असताना जयंत पाटील यांच्याकडे अर्थमंत्रिपद होतं. २००४ ते २००८ या कालावधीत पाटील अर्थमंत्रिपदी होते. त्यावेळी भाजपचे देवेंद्र फडणवीस राज्याच्या राजकारणात नवखे होते. १९९९ मध्ये ते पहिल्यांदा आमदार झाले. २००४ मध्ये ते पुन्हा निवडून आले.

दुसऱ्या टर्मचे आमदार असलेले फडणवीस अर्थसंकल्पातील बारीकसारीक गोष्टी, खाचाखोचा जाणून घेण्यासाठी अर्थमंत्री असलेल्या जयंत पाटील यांच्याकडे जायचे. अर्थसंकल्पाबद्दल फडणवीसांना बरंच कुतूहल होतं. मनात असलेल्या जिज्ञासेपोटी ते अनेकदा जयंत पाटील यांच्याकडे जायचे. पाटील यांना त्यांना अर्थसंकल्प आणि त्याच्याशी संबंधित अनेक बारकावे शिकवले. फडणवीसांनी एखाद्या विद्यार्थीप्रमाणे ते शिकून घेतले. त्याचा फायदा पुढे फडणवीसांना झाला. आता फडणवीसांचे 'फायनान्स ट्युशन टीचर' महायुती सरकारमध्ये येणार का, त्यासाठी भाजप ऑपरेशन लोटस राबवणार का, असे विविध प्रश्न आहेत. त्यांची उत्तरं लवकरच मिळण्याची शक्यता आहे.

## गडकरींच्या भेटीनंतर मुनंगटीवार थेट बोलले, म्हणाले; ज्यांचा मुलगा दुसऱ्या पक्षातून लढला, त्यांना मंत्रिपद दिलं, कालपर्यंत माझं नाव होतं, पण...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ नागपूर**

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार अखेर नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वीसंध्येला संपन्न झाला असून पुढील दोन दिवसांत जागावाटप देखील होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेतून माहिती देताना सांगितले. मात्र, राज्य सरकारच्या मंत्रिमंडळात नव्या चेहऱ्यांना संधी देत, अनेक दिग्गजांना डावलण्यात आलं आहे. त्यामध्ये, अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ५ वरिष्ठ नेत्यांना मंत्रीपदातून वगळले आहे. तर, भाजपनेही शिंदे सरकारमध्ये मंत्री राहिलेल्या ४ नेत्यांचा पत्ता कट केला आहे. त्यामध्ये, भाजपचे वरिष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार आणि रविंद्र चव्हाण यांचाही समावेश आहे. मात्र, रविंद्र चव्हाण यांना भाजपकडून प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते. मग, सुधीर मुनगंटीवार यांचं काय होणार, सुधीर मुनगंटीवारांना नेमकं कशामुळे मंत्रिपद नाकारण्यात आलं, याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यातच, सुधीर मुनगंटीवार हे भाजपचे वरिष्ठ नेते व केंद्रीयमंत्री



नितीन गडकरी यांच्या भेटीला गेले होते. या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये दीडतास चर्चा झाली असून त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देत आपल्या मनातील खदखद बोलून दाखवली.

भाजपचे नाराज नेते सुधीर मुनगंटीवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या भेटीला त्यांच्या निवासस्थानी गेले होते. विशेष म्हणजे या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल दीड तास चर्चा झाल्याची माहिती आहे, या भेटीवेळी खालून सिक्युरिटी गार्डने कोणालाही घरात सोडले नाही. त्यामुळे, दोन नेत्यांमध्ये नेमकं काय चर्चा झाली, मंत्रिपद न मिळाल्याने नाराज झालेल्या मुनगंटीवारांनी गडकरी यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला.

नितीन गडकरी हे माझे मार्गदर्शक आहे, म्हणून आज त्यांची भेट घेतली. मला मंत्रिमंडळात नाव आहे असं सांगण्यात आलं होतं, पण मी आज मंत्री नाही. तरीही, मी नाराज असण्याचं कारण नाही. कारण, काल जे आपल्यापाशी होतं ते उद्या जाणार आहे. उद्या जे आपल्यापाशी नसेल ते परवा येणार आहे, याची मला जाणीव आहे, असे म्हणत मी नाराज नसल्याचं सुधीर मुनगंटीवर यांनी म्हटलं. मात्र, किशोर जोगरेवार, गणेश नाईक यांचा संदर्भ देत, ज्यांचा मुलगा दुसऱ्या पक्षात जाऊन लढला त्यांनाही मंत्रिपद दिलं जातं, असे म्हणत अप्रत्यक्षपणे त्यांनी मनातील खदखद बोलून दाखवली.

## अखेर मनोज जरांगेंचा पत्ता ओपन, मंत्रिमंडळ विस्तार होताच अंतरवालीमधून केली मोठी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ जालना**

रविवारी मंत्रिमंडळाचा विस्तार झाला, त्यानंतर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील ॲक्शन मोडमध्ये आल्याचं पाहायला मिळत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला सरकारनं स्वतंत्र आरक्षण दिलं, मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांची आहे, ते अजूनही आपल्या मागणीवर ठाम आहेत. तर दुसरीकडे ओबीसी समाजाकडून या मागणीला विरोध होत आहे.



दरम्यान मंत्रिमंड विस्ताराच्या दुसऱ्याच दिवशी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. मंत्र्यांचा शपथविधी झाला, आता उद्या पत्रकार परिषद घेऊन आमरण उपोषणाची तारीख सांगणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे. यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं की, ज्यांना स्वतःच्या मनाने सामूहिक आमरण उपोषणाला बसायचं, त्यांनाच उपोषणाला बसवलं जाईल, उपोषणाला बसण्यासाठी कोणावरही बंधन घातलं जाणार नाही. आमरण उपोषणाला कोणी नाही जरी बसलं, तरी मी एकटाच बसणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना त्यांनी म्हटलं की, मी जर उपोषणाला बसा म्हटलं तर घराघरांमधून मराठे उपोषणाला बसतील, अशा इशाराही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

सरकारने या हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी काढावा अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. सरकार या आधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न नक्की सोडवेल अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलल्या प्रमाणे मराठा आरक्षण दिलं पाहिजे अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे.

दरम्यान काल मंत्रिमंडळाचा विस्तार झाला, मात्र या मंत्रिमंडळातून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. यावरून भुजबळांनी नाराजी व्यक्त केली. भुजबळांना डावलण्यात आलं, यावर देखील जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात का घेतलं नाही? हा आमचा प्रश्न नसून मराठा आरक्षणाच्या मारेकऱ्याच आम्हाला देणं घेणं नसल्याचं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## छगन भुजबळांना मंत्रिमंडळातून डावलणे म्हणजे ओबीसी चळवळीवर अन्याय : विजय वडेट्टीवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ नागपुर**

महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार पार पडलाय. नव्या सरकारमध्ये ३९ नेत्यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली आहे. यामध्ये ३३ कॅबिनेट तर ६ राज्यमंत्री आहेत. भाजपमधील १९ नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. शिंदेंच्या शिवसेनेतील ११ नेत्यांनी तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील ९ नेत्यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली आहे. महत्त्वाचं म्हणजे, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपदापासून वंचित ठेवण्यात आलं आहे. यावर छगन भुजबळ यांनी नाराजीही व्यक्त केली आहे. दरम्यान, आता छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. ते नागपूरमध्ये बोलत होते.



छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलने फक्त हा छगन भुजबळ यांच्यावरचा अन्याय नाही तर तो ओबीसी चळवळीवरचाच अन्याय आहे, असं मत काँग्रेसचे जेष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले आहे. सरकारवर व त्यांच्या मंत्र्यांवर अंकुश ठेवायला विरोधी पक्ष सभागृहात गरजेचा असतो. विधानसभा अध्यक्ष राज्य सरकारने बनवला असतो. त्यामुळे विरोधीपक्ष नेता बनवने हे राज्य सरकारच्या इच्छेवर अवलंबून असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

छगन भुजबळ यांच्या अन्याय झाला आहे. त्यांना संसदीय कामकाजाचा मोठा अनुभव आहे. ते विरोधात एकटे आमदार असतांना सभागृह गाजवून टाकायचे. त्यांच्या पक्षात काय स्पर्धा आहे यावर मी बोलणार नाही. मात्र मी त्यांच्यासोबत काम केले आहे छगन भुजबळांवर अन्याय झाल्याचे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

## मला ज्या दिवशी बोलायचं असेल तेव्हा...; मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर तानाजी सावंतांचे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते आणि माजी मंत्री तानाजी सावंत यांना यंदाच्या मंत्रिमंडळात स्थान मिळालं नसल्याने ते नाराज झाले आहेत. त्यामुळे अधिवेशन सोडून ते अचानक पुण्याला निघून आल्याचं बोललं जात आहे. या पार्श्वभूमीवर विविध प्रसारमाध्यमांकडून आमदार सावंत यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न होत होता. त्यामुळे तानाजी सावंत यांच्या कार्यालयाने एक निवेदन जारी करत तूर्तास सावंत यांना संपर्क करण्याचा प्रयत्न करू नये, असं आवाहन केलं आहे.



तानाजी सावंत यांच्या कार्यालयाने जारी केलेल्या निवदेनात प्रसारमाध्यमांना उद्देशून म्हटलं आहे की, तानाजी सावंत हे नाराज असल्याच्या बातम्या आपल्या माध्यमातून वाचायला आणि पाहायला मिळत आहेत. त्यावरून सातत्याने सावंत साहेबांशी प्रतिक्रिया आणि बाईटसाठी विचारणा केली जात आहे. आम्ही आपल्याला कळवू इच्छितो की, सावंत साहेबांना ज्यादिवशी या सगळ्याबाबत बोलायचे आहे, त्यादिवशी आपल्या सगळ्यांशी निश्चितपणे संपर्क साधला जाईल. तोपर्यंत कृपया कुणीही बाईटसाठी पाठपुरावा करू नये, ही विनंती. आज संध्याकाळीही सावंत साहेब बाईटसाठी उपलब्ध नसतील, याची कृपया नोंद घ्यावी, अशी माहिती त्यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

## संपादकीय ......

# सत्ताधार्यांची कोंडी करण्यात विरोधक अपयशी

*एकीकडे राज्यसभेत सभापतींच्या विरोधात देशाच्या संसदीय इतिहासात प्रथमच अविश्वास प्रस्ताव आणला आहे, तर दुसरीकडे राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल लोकसभेत झालेल्या चर्चेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्यापेक्षा चांगला वक्ता सध्याच्या सभागृहात कोणी नाही, हे पुन्हा सिद्ध केले. विरोधकांना समाधान देणारी तेवढी एकच गोष्ट आहे की, पहिल्यांदाच खासदार झालेल्या प्रियांका गांधी यांनी भाषणाने केवळ काँग्रेसच्याच नव्हे, तर विरोधकांच्या आशा उंचावल्या आहेत.*

*प्रियांका गांधी यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर आणि कृतींवर ज्या सहजतेने हल्ला चढवला, ते कौतुकास्पद आहे. त्याचवेळी अडवणूक करणार्या सत्ताधार्यांनाही त्यांनी आपल्या मार्मिक उत्तराने अवाक् केले. आणीबाणीबाबत सत्ताधार्यांकडून होत असलेल्या हल्ल्याला उत्तर देताना त्यांनी काँग्रेसने चुकांमधून धडा घेत माफी मागितल्याचे सहजपणे सांगितले. यासोबतच सत्ताधार्यांना सल्ले देताना त्यांनी आपले मतही मांडले. तुम्हीही काँग्रेसकडून का शिकत नाही? माफी का मागत नाही? याच क्रमात बॅलेट पेपरद्वारे निवडणुका घेण्याबाबतही त्या बोलल्या. शिकणे आणि माफीनामा यांचा संबंध बॅलेट पेपरशी जोडत प्रियांका गांधी यांनी सत्ताधार्यांना चातुर्य दाखवले आणि त्यांना इंदिरा गांधींसारखी 'न बोलणारे' समजू नये, असे स्पष्ट केले. इंदिरा गांधी जेव्हा सभागृहाच्या सदस्य झाल्या, तेव्हा त्यांना 'न बोलणारी' असे संबोधले जात होते. नंतर त्यांनी या प्रतिमेला छेद देत स्वतःला 'दुर्गा' म्हणवून घेतले.*

*संविधानावरील चर्चेदरम्यानच्या भाषणांचा आढावा घेतला तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जुन्या-नव्या सर्व गोष्टींची सांगड घालून काँग्रेसवर हल्ला चढवला. नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि अगदी राहुल गांधी यांनाही सोडले नाही. नेहरू आणि गांधी घराण्याने राज्यघटनेचा अवमान केल्याची उदाहरणे देत त्यांनी तीन पंतप्रधानांच्या कार्यकाळातील त्रुटींकडे लक्ष वेधले. सरदार पटेल यांना पंतप्रधान न करण्याच्या नेहरूंच्या मनमानी कारभाराचा उल्लेख करून त्यांनी काँग्रेसच्या घराणेशाहीचा स्वार्थी स्वभाव दाखवला. दुसरीकडे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाषणाने निराशा केली. प्रियांका गांधींनी सांगितलेल्याच सर्व गोष्टी त्यांनी पुन्हा सांगितल्या. प्रियांकाच्या भाषणांव्यतिरिक्त इतर मुद्द्यांवरून सरकारला कोंडीत पकडण्याची संधी त्यांनी गमावली. राहुल गांधी यांच्या भाषणातील अनेक गोष्टी जुन्या होत्या, ज्या त्यांनी अनेक वेळा सांगितल्या आहेत. राहुल गांधी यांनी एकलव्य आणि द्रोणाचार्यांची गोष्ट सांगत जातीय आधारावर सत्ताधारी पक्षाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला; मात्र समन्वयाअभावी हा प्रयत्न पूर्णपणे फसला.*

*प्रियांका गांधी यांच्या भाषणाबद्दल बोलायचे झाले तर, हे सर्वोत्कृष्ट भाषण होते. प्रियांका यांनी भाषणात शेतकर्यांचे प्रश्न मांडले. यावेळी त्या आपल्या लोकसभा मतदारसंघाचा उल्लेख करायला विसरल्या नाहीत. सरकारला कोंडीत पकडण्यासाठी त्यांनी वायनाड ते ललितपूरपर्यंतच्या शेतकर्यांच्या स्थितीचा उल्लेख केला. संभल आणि उन्नावच्या घटनांचा संदर्भ देत त्यांनी दलित आणि अल्पसंख्याकांवरील अत्याचाराबाबत केंद्र सरकारवर हल्लाबोल करताना मागेपुढे पाहिले नाही. जातनिहाय जनगणनेबाबत बोलून त्यांनी मागासवर्गीयांना मदत करण्याचे काम केले. देशातील महिलांना म्हणजे निम्म्या लोकसंख्येला प्रतिनिधित्व देण्यासाठी दहा वर्षांनंतर महिला आरक्षण लागू करण्याचा मुद्दा योग्य पद्धतीने मांडला आणि सरकारला कोंडीत पकडले. आजच्या महिलांनी आपल्या हक्कासाठी दहा वर्षे का वाट पाहावी, असेही त्या म्हणाले. महिलांसाठी असलेला हा संदेश त्यांच्या मतांत बदलला तर येत्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला नुकसान सहन करावे लागू शकते. पुढील वर्षी दिल्ली आणि बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. अशा स्थितीत प्रियांका यांच्या शब्दांचा काय परिणाम होईल, याचा अंदाज सहज लावता येतो. त्यांनी आपले सर्व विचार अगदी प्रामाणिकपणे मांडले. प्रियांका गांधी यांच्याकडे जबाबदारी देण्याबाबत पक्षांतर्गत चर्चा होऊ शकते. प्रियांका गांधी यांना विरोधी पक्षनेतेपद देण्याची मागणीही होऊ शकते. इतर विरोधी पक्ष जे राहुल गांधी यांच्या नावावर कुरघोडी करतात, त्यांनाही प्रियांकांसोबत चालणे सोयीचे वाटू शकेल. प्रियांका यांनाही महिला असल्याचा फायदा मिळणार आहे.*

*लोकसभेत या चर्चेपूर्वी राज्यसभेत जे घडले त्या घटनेची इतिहासात नोंद झाली आहे. सभापती जगदीप धनकड यांच्या विरोधात ६० राज्यसभा सदस्यांच्या स्वाक्षरीचा प्रस्ताव आणण्यात आला आहे, ज्यामध्ये पक्षपातीपणाच्या कारणावरून त्यांना पदावरून हटवण्याची मागणी करण्यात आली आहे; मात्र तो धक्का देण्याइतकी ताकद विरोधी पक्षांकडे नसल्याने हा प्रस्ताव मंजूर होण्याची शक्यता नाही. मात्र, हा संदेश चिंताजनक आहे. यावरून सभागृहाचे प्रमुख, सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यातील संवादाची दरी आणि विश्वासाचा अभाव दिसून येतो. लोकशाही व्यवस्थेत संसद हे चर्चेसाठी सर्वोच्च व्यासपीठ असते. राजकीय पक्ष लोकांचे प्रतिनिधित्व करतात, त्यांनी संसदेत बोलले पाहिजे, विविध बाबींवर त्यांची सहमती आणि असहमती दर्शवली पाहिजे; मात्र संसदेत संवाद होत नाही, तर सभागृह आता एक उच्च ध्रुवीकरणाचे एक मंच बनले आहे, जेथे आरोपांची देवाणघेवाण होते, शत्रुत्व अधिकच वाढते. हे सत्र चालू असतानाही अनेक वेळा कामकाज स्थगित केले गेले.*

# छोटा व्यवसाय सुरु करायचाय? गटई स्टॉल योजना आहे ना! वाचा सविस्तर

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**

-महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील बांधवांचे जीवनमान उंचाविण्यासाठी तसेच शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासासाठी गटई स्टॉल योजनेची सुरुवात केली आहे. योजनेसाठी अर्ज भरण्याची ३१ डिसेंबर ही अंतिम मुदत आहे.




### अर्ज विनामूल्य प्राप्त करून घ्यावा

या व्यवसाय योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या गरजू अर्जदारांनी विहित नमुना अर्ज समाजकल्याण कार्यालयातुन प्राप्त करून घ्यावा. त्यासह अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल, ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड किंवा महापालिका यांनी त्यास भाड्याने, करारनाम्याने, खरेदीने अगर मोफत, परंतु अधिकृतरीत्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती त्याच्या स्वमालकीची असावी.

### इतके हवे उत्पन्न

अनुसूचित जातीच्या गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्यात येणार आहे. हे स्टॉल मिळण्याकरिता अर्जदाराने अर्ज सादर करावा, अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आणि अनुसूचित जातीचा असावा, अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी ४० हजार रुपये आणि शहरी भागासाठी ५० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. तसेच अर्जदाराचे वय १८ वर्षे ते ५० वर्षापर्यंत असावे.

### ही आहेत आवश्यक कागदपत्रे

ओळखपत्र : आधार कार्ड, वाहनचालक परवाना, पासपोर्ट.

रहिवासी दाखला : रेशन कार्ड, आधार कार्ड, वीज बिल, टेलिफोन बिल मोबाइल नंबर, ई-मेल आयडी अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो जात प्रमाणपत्र उत्पन्नाचा दाखला अपंग असेल तर अपंग प्रमाणपत्र, बँक पासबुक.

### येथे करा अर्ज

या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी अर्जदाराला आपल्या जवळच्या जिल्हा समाजकल्याण कार्यालयात जाऊन गटई स्टॉल योजनेचा अर्ज घ्यावा लागेल आणि अर्जात विचारलेली सर्व माहिती भरून सोबत आवश्यक कागदपत्रे जोडून सदर अर्ज जमा करावा लागेल.




# सकाळी पोट नीट साफ होतच नाही? फिटनेस ट्रेनर अंशुका सांगते १ उपाय...

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्यापैकी काही जणांना पोटाच्या अनेक समस्या कायम वर्षभर सतावतात. काहीवेळा पोटाच्या वारंवार येणाऱ्या सततच्या तक्रारींमुळे नकोसे होते. याचबरोबर सकाळच्या वेळी व्यवस्थित पोट साफ न होणे, हवं तसे प्रेशर न येणे, पोटात सतत गुडगुड होत राहणं अशा अनेक समस्या (धेसर षी उेपींीळरिींळेप) छळतात. सकाळच्या वेळी जर व्यवस्थित पोट साफ झाले नाही तर दिवसभर बिघडलेलं पोट (Suffering from constipation Try this yogasana for overall good digestion) अधिकच त्रास देत. अशावेळी पोट साफ करण्यासाठी आपण एक खास योगासनं नक्की करु शकतो. 'मलासन' हा देखील एक योगासनांमधील एक उत्तम असा प्रकार आहे. ज्यांना पोटाच्या समस्या आहेत अशा लोकांनी नियमित मलासनाचा सराव केल्यास पोटाच्या अनेक समस्या कमी होतात. 'मलासन' करणं खूपच सोपं आहे



मलासन केल्याने गॅस आणि ॲसिडीटीसारख्या पोटाच्या समस्या दूर होतात. याचबरोबर सकाळी रिकाम्या पोटी पाणी प्यायल्याने शरीराचे डिटॉक्सिफिकेशन होते. डोकेदुखी आणि मायग्रेनपासून बचाव होतो, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, तणाव कमी होतो, वजन कमी होते आणि पोटाशी संबंधित समस्या उद्भवत नाहीत. तसेच, लघवीतील जळजळ काम होते आणि त्वचा निरोगी आणि चमकदार बनते. याशिवाय शरीराचे तापमान नियंत्रणात राहते, शरीरातील ऊर्जेची पातळी वाढते आणि नवीन पेशी आणि स्नायू तयार होण्याची प्रक्रिया वेगवान होते. त्यामुळे मलासन करता करता पाणी प्यायल्याने शरीराच्या अनेक व्याधी बऱ्या होण्यास मदत मिळते. सुप्रसिद्ध सेलिब्रिटी फिटनेस ट्रेनर अंशुका परवानी यांनी पाणी पीत पीत 'मलासन' करण्याचे अनेक फायदे सांगितलेले आहेत.

**मलासन करण्याची योग्य पद्धत :-**

१. सर्वातआधी योगा मॅटवर सरळ उभे राहा.

२. पाय सरळ ठेवत पोट आतमध्ये घ्या.

३. खांदे ताणून घ्या आणि दीर्घ श्वास घ्या.

४. हात जोडून नमस्कार करा.

५. श्वास सोडत गुडघे दुमडून खाली बसा.

६. पायांच्या जांघेमध्ये ताण येईल अशा पद्धतीने दोन्ही पाय बाहेरच्या दिशेने ताणून घ्यावेत.

७. या स्थितीत राहून पाणी प्यावे.( योगा करताना थोडे थोडे पाणी प्या. एकाच वेळी जास्त पाणी प्यायल्याने अनेक समस्या उद्भवू शकतात. स्वतःला हायड्रेटेड ठेवा, परंतु योग करण्यापूर्वी किंवा दरम्यान जास्त पाणी पिणे टाळा.)

८. दीर्घ श्वास घेत पुन्हा पूर्वस्थितीत यावे.

# मजुर समस्येवर मात करण्यास कोळवणच्या युवकाने कमी खर्चात तयार केली भातझोडणी मशीन

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**

'गरज ही शोधाची जननी असते' या म्हणीप्रमाणे कामाला सुरुवात करीत, वेल्डिंगचा मजुरी खर्च वाचविण्यासाठी स्वतःच वेल्डिंगचे काम केले.कोळवण येथील पंढरीनाथ रामदास दुडे या युवकाने वेल्डिंग कामाचा कोणतेही अनुभव, प्रशिक्षण नसताना येणाऱ्या अडचणींवर माहिती घेत मात केली. मजुरांच्या कमतरतेवर मात करण्यासाठी भंगारातील व टाकाऊ साहित्याचा वापर करीत टाकाऊ साहित्यातून टिकाऊ शेतकऱ्यांसाठी उपयुक्त भातझोडणी यंत्राची निर्मिती केली आहे.







सध्या मोठ्या प्रमाणात गावाकडून शहराकडे लोकांचे स्थलांतर झाले आहे. शेतीची कामे करण्यासाठी मनुष्यबळ मिळणे कठीण झाले आहे. मिळाल्यास तर मजुरी जास्त असल्याने उत्पादन खर्चात वाढ होते. परिणामी शेतकरीवर्ग हैराण झाला आहे. त्यामुळे येथील तरुणाने हे देशी जुगाड शोधले आहे. या यंत्रामुळे वेळेची आणि पैशाची बचत होते. पाच ते सहा माणसाचे काम दोन माणसेदेखील अगदी निम्म्या वेळेत करू शकतात. असे भात झोडणी मशीन या युवकाने बनविले आहे. जुने लोखंडी पाईप, अँगल, पत्रा व मोटर वापरत व काही नवीन वस्तू वापरून हे यंत्र तयार करण्यात आले आहे. त्याला अंदाजे १५ ते २० हजार रुपये खर्च आला आहे. कोळवण खोरे हे भाताचे आगार म्हणून ओळखले जाते. या यंत्रामुळे तेथील स्थानिक, तसेच मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. या यंत्राची माहिती घेण्यासाठी अनेक शेतकरी पंढरीनाथ दुडे यांच्याकडे येत आहेत.

भात झोडणी सुलभ व्हावी, यासाठी बाजारात १८ हजारांपासून विविध कंपन्यांचे भात झोडणी यंत्र विकत मिळते. वर्षातून एकदाच भात पीक घेतले असल्यामुळे ते यंत्र पुढे आठ महिने पडून राहते. त्यासाठी त्यांनी भंगारातील टाकाऊ पत्रा, शेटरच्या पट्या, पंप, बेल्ट व बेरिंग एकत्र करून मशीन बनविले.

### असा होतो यंत्राचा वापर

या यंत्राने एका मिनिटात एक व्यक्ती सहा भाताच्या पेंढ्या झोडू शकतात.

या यंत्रावर एका वेळी चार व्यक्ती एकत्र काम करू शकतात.

६० मिनिटांत चार व्यक्ती मिळून १४४० पेंढ्या झोडू शकतात.

काम करताना हातांना त्रास कमी, कष्ट कमी, वेळ कमी, ब्लोअर मशीन वापरली तर उपणनी पुन्हा करावी लागत नाही.

पेंढा शेतकऱ्यांना पूर्णपणे वापरता येतो.

# रोख रक्कम व दागिने लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती-** आसेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असदपूर येथील रहिवासी जुनेद जकी खान अजमत खान यांच्या घरातून चोराने रोख रक्कमेसह दागिने असा एकुण १ लाख २५ हजाराचा मुद्देमाल लंपास केला. जुनेद जकी खान हे त्यांच्या मुलीच्या रिसेप्शनला गेले होते. तेथून ते परत घरी आले असता त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले व अज्ञात चोरट्यांनी घरातून रोख ६३ हजार रुपये, ३ ग्रॅम सोन्याची अंगठी २१ हजार रुपये, कर्णफुले ४ ग्रॅम वजनाचे २० हजार रुपये व चांदीचे दागिने २१ तोळे असा एकूण १ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे दिसून आले. जुनद जकी यांच्या फिर्यादीवरून आसेगाव पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीचा २० वर्षीय तरुणाने विनयभंग केला. आरोपी तरुण हा शेकोटीजवळ बसला होता. यावेळी त्याने तरुणीचा हात दाबून तिला बळजबरीने गाडीच्या मागे बसविले आणि तिचा विनयभंग केला. अल्पवयीन मुलीच्या आईच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

**तरुणाने घेतला गळफास-** तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना खोलापुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील माताखिडकी परिसरात उघडकीस आली. राहुल नितीन वानखडे (वय २४) असे मृताचे नाव आहे. त्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्या करण्याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. खोलापुरीगेट पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद घेतली.

# राष्ट्रीय लोक अदालतींत ८८०५ प्रकरणाचा निपटारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती-** स्थानिक जिल्हा व सत्र न्यायालय येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एकूण ८८०५ प्रकरणाचा निपटारा करण्यात आला. लोक अदालती मध्ये मोटर अपघात नुकसान भरपाई प्रकरण, दिवाणी व फौजदारी, बँकेचे प्रलंबित, धनादेश अनादरण, भूसंपादन, विवाह संबंधी कायदे दावे, बँकेचे तसेच दिवाणी आणि फौजदारी अपील व इतर दिवाणी प्रकरणे संबंधित दाखल पूर्व प्रकरणे सुद्धा तडजोडी करिता ठेवण्यात आली होती. लोक अदालतीमध्ये ठेवलेल्या प्रकरणाची पूर्तता करण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात एकूण ४६ मंडळ ची निर्मिती करण्यात आली होती. ज्यामध्ये न्यायाधीश,अधिवक्ता तसेच न्यायालयीन कर्मचारी यांचा समावेश होता. जिल्हा व सत्र न्यायालयात आयोजित लोक अदालतीला चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील एकूण ४७,९८३ दाखल पूर्व प्रकरण ठेवण्यात आले होते. त्यापैकी ४२१७ प्रकरण तर एकूण १३,९६७ प्रलंबित प्रकरणांपैकी २२२६ प्रकरणे असे एकूण ६४४३ प्रकरणाचा यशस्वीरित्या निपटारा करण्यात आला.



सदर लोक अदालतीच्या माध्यमातून एकूण १३ कोटी ५०० लाख ८५५ रक्कमेचा न्यायनिवाडा झाला. तसेच उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे ९ ते १३ डिसेंबर पर्यंत विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिम अंतर्गत २३६२ प्रकरणाचा निपटारा करण्यात आला. अशाप्रकारे एकूण ८८०५ प्रकरणाचा निपटारा लोक अदालतीमध्ये करण्यात आला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यालगड्डा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सचिव कमला कांबळे, वकील संघ अध्यक्ष एड. काळे आणि सरकारी वकील संघातील सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालत यशस्वीरित्या संपन्न झाली.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १६ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# मंत्रिमंडळ विस्तारानंतर नाराजांनी अधिवेशन सोडले

## भाजपाचे एक समर्थक आमदार घरी परतले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती–** फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात वर्णी न लागल्याने महायुतीत नाराजांचे रुसवे-फुगवे सुरु झाले आहेत. सुरुवात शिवसेनेपासून झाली असून अजित पवारांची राष्ट्रवादीही त्यातून सुटलेली नाही. अशातच शिंदेंचे एक माजी मंत्री आणि एक भाजप समर्थक आमदार अधिवेशन सोडून घरी परतल्याचे वृत्त आहे.

मंत्रिपद न मिळाल्याने शिवसेनेच उपनेत्याचा पहिला राजीनामा पडला होता. यानंतर अजित पवारांच्या गोटातून छगन भुजबळ यांनी पक्षाच्या मेळाव्याला गैरहजेरी लावत नाराजी जाहीर केली होती. आता या नाराजीचे वारे भाजपात सुरु झाले आहेत. तानाजी सावंतांनी देखील मंत्रिपद न मिळाल्याने राजभवनातील शपथविधी सोहळ्याकडे पाठ फिरविली होती. भाजपातही आता नाराजी पसरू लागली असून नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार कृष्णा खोपडे यांच्या



कार्यकर्त्यांनी त्यांचे घर गाठत संघटनात्मक पदांचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे यांना मंत्री न केल्याने भाजपा कार्यकर्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाब विचारण्यासाठी नागपूरकडे निघणार आहेत.

अशातच रवी राणांबाबत मोठे वृत्त येत आहे. मंत्रिपदासाठी इच्छुक असलेल्या राणा यांना विस्तारात स्थान न मिळाल्याने ते नाराज झाले आहेत. राणा यांनी अधिवेशन सोडून तडक अमरावती गाठली आहे. अमरावतीत भाजपाचे वर्चस्व असूनही सातपैकी एकालाही मंत्रिपद न मिळाल्याने राणा समर्थकांनी सोशल मीडियावर हल्लाबोल सुरु केला आहे. अशातच राणा हे अमरावतीला निघून गेल्याने चर्चांना उधाण आले आहे.

## भिंत कोसळल्याने महिलेचा दबून मृत्यू

**नाचणगावच्या खडकपुऱ्यातील घटना**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ पुलगाव–** शौचालयाची भिंत कोसळल्याने त्याखाली दबून ७२ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. ही घटना नाचणगाव येथील खडकपुरा परिसरात घडली. शांताबाई लक्ष्मण ठाकूर (७२, रा. नाचणगाव) असे मृत महिलेचे नाव आहे.

महिलेच्या घराशेजारीच काही वर्षांपूर्वी शौचालयाचे बांधकाम करण्यात आले होते. शनिवारी सकाळी शौचालयाच्या भिंतीजवळ नेहमीप्रमाणे शांताबाई काम करीत होत्या. दरम्यान अचानक शौचालयाची भिंत कोसळली.

त्या भिंतीखाली शांताबाई दबल्या गेल्या. त्यातच तिचा मृत्यू झाला. घटना लक्षात येताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत भिंतीचा मलबा बाजूला सारला. दरम्यान, घटनेची माहिती कोतवाल रवी मेहेकरे यांनी पोलिसांना दिली. याप्रकरणी पुलगाव पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. शौचालय ग्रामपंचायत प्रशासनाद्वारे बांधून देण्यात आले होते. सदर काम हे निकृष्ट दर्जाचे असल्याने भिंत कोसळून महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणाची चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.

# डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे इंजीनिअर तरूण दगावला

## आईची राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती–** डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे चुकीचा उपचार झाल्यामुळे एका इंजीनिअर असलेल्या तरुणाचा मृत्यू झाला. दीपक रमेश आठवले (३५, रा. आदिशक्ती अपार्टमेंट, गणपती नगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. गणपती नगरात राहणारे ३५ वर्षीय दिपक आठवले हे अभियंता म्हणून कर्तव्य बजावत होते. डॉक्टरांच्या चुकीच्या उपचारामुळे मृत्यू झाल्याचा आरोप आईने केल्यामुळे खळबळ उडाली होती. याप्रकरणात मृताच्या आईने राजापेठ पोलिस ठाण्यात १५ डिसेंबर रोजी तक्रार दिली असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

आई शोभा आठवले यांच्या तक्रारीनुसार, दीपक आठवले हा अभियंता होता. तो अमरावतीच्या ईसीई सोलर कंपनीत नोकरीला होता. गेल्या दोन वर्षांपासून तो गणपती नगर येथील आदिशक्ती अपार्टमेंटमध्ये राहत होता. १२ डिसेंबर रोजी दीपक आठवले यांना ताप आणि थंडी जाणवू लागली. त्यानंतर त्यांना गोपाळ नगर येथील डॉ.विवेक भोयर यांच्या रुग्णालयात नेण्यात आले. जिथे डॉक्टरांनी उपचार केले. ज्यामुळे त्याला काही वेळ बरे वाटले. मात्र त्यानंतर दुसर्या दिवशी त्यांची प्रकृती खालावली. १४ डिसेंबर रोजी सायंकाळी खूप ताप आल्याने त्यांना पुन्हा डॉक्टरांच्या दवाखान्यात उपचारासाठी नेण्यात आले. जिथे डॉक्टरांनी त्याला सलाईनचे तीन इंजेक्शन दिले. त्यानंतर आई आणि मुलगा दोघेही घरी परतले. घरी परतल्यानंतर पाच मिनिटांतच दीपकला थंडी जाणवू लागली. दीपकच्या आईने डॉक्टरांना फोन करून घरी बोलावले. जिथे डॉक्टरांनी त्याला पुन्हा इंजेक्शन दिले. त्यानंतर त्यांची आणखी तब्येत बिघडली. त्यानंतर दीपकची आई शोभा यांनी दिपकला ऑटोमध्ये बसवून खासगी रुग्णालयात नेले. यावेळी डॉक्टरही त्यांच्यासोबत होते. ते एका खासगी रुग्णालयात गेले असता डॉक्टरांनी त्यांना इर्विन रुग्णालयात जाण्यास सांगितले. त्यानंतर डॉक्टर तेथून पळून गेला. शोभा आठवले यांनी दीपकला इर्विन रुग्णालयात नेले, तेथे डॉक्टरांनी दीपक आठवले यांना मृत घोषित केले. त्यानंतर नातेवाईकांनी संताप व्यक्त केला. डॉक्टरनेच चुकीचा उपचार केल्याने दिपकचा मृत्यू झाल्याचा आरोप आईने केला. याबाबत फिर्याद शोभा आठवले यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात दिली. ३५ वर्षीय मुलाचा अल्पशा आजाराने मृत्यू झाल्याने आई शोभा आठवले यांना मोठा धक्का बसला आहे. तसेच नातेवाईकांमध्येही रोष व्यक्त करण्यात आला. याबाबतची माहिती कुटुंबीयांना मिळताच त्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात एकच गर्दी केली होती. डॉक्टरांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली. यावेळी पोलिसांनी नातेवाईकांची समजुत काढली. त्यानंतर मृताच्या आईने या घटनेची तक्रार राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. पुढील तपास पोलिस करीत आहेत.०

# गोवंश तस्करांच्या आवळल्या मुसक्या

## मोर्शीत दोन तर चांदुररेल्वेत एक कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती–** सालबर्डी ते पाळा रोडवरील भिवकुंडी फाट्याजवळ दोन टाटा मालवाहू वाहनातून गोवंश जनावरांची तस्करी सुरु असल्याची घटना १५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजताचे सुमारास उघडकीस आली. याप्रकरणात मोर्शी पोलिसांनी दोन्ही टाटा एक्स वाहनासह ६ लक्ष ६६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. मध्यप्रदेश येथून सालबर्डी मार्गे पाळा एम.एच.३१ सीबी ९५३५ व एम एच ०४/६८८५ या

### सालबर्डी ते पाळा रोडवरील भिवकुंडी फाट्याजवळ कारवाई

क्रमांकाच्या वाहनामध्ये गोवंशांना अतिशय निर्दयतेने व अमानुषरित्या कोंबून कत्तलीसाठी नेले जात असल्याची गोपनीय माहिती मोर्शी पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून पोलिसांनी भिवकुंडी फाट्यावर पाळत ठेवून पहिल्या टाटा एक्स गाडीचा ड्रायव्हर कार्तिक संदीप येवतकर (वय २२ वर्ष रा. जलालखेडा) व दुसरी टाटा एक्स गाडीचा ड्रायव्हर धीरज राजेंद्र बडोदे (वय २५ वर्ष रा. चांदस वाठोडा) यांना ताब्यात घेऊन दोन्ही गाड्यांची पाहणी केली असता जनावरांना अमानुषरित्या अगदी क्रूरपणे बांधून ठेवल्याचे आढळून आले. दोन्ही ड्रायव्हर यांना विचारपूस केली असता त्यांच्याकडे खरेदी विक्रीच्या कोणत्याही पावत्या नव्हत्या. गाडीमधील ६ जनावरे ही साकीब अहमद नाशिर अहमद (वय २५ वर्षे रा. नेरपिंगळाई) यांचे मालकीचे जनावरे असल्याचे त्यांनी सांगितले. लगेच जनावरांना सोडून गाडीतून बाहेर काढून भगवान परशुराम गोसेवा चॅरिटेबल ट्रस्ट नांदगाव पेठ येथे दाखल करण्यात आले. जनावरांचे पालन पोषण व चार्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध भादवी कलम ३२४, २८१ तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

ही धाडसी कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी स्कॉडचे पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरुकुल, स्वप्निल बायस्कर, छत्रपती करपते यांनी केली आहे. अवैध जनावरे कत्तलीसाठी नेण्याचा गोरखधंदा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. महाराष्ट्र शासनाने गोवंश हत्याबंदीचा कायदा करून सुद्धा कायद्याला धाब्यावर बसवून मध्यप्रदेशातून अवैध जनावरांची तस्करी मोठ्या प्रमाणात सुरू आहे.तरी शासनाने वेगळा कायदा अमलात आणून आरोपींविरुद्ध कठोरात कठोर कारवाई करावी तसेच आरटीओ मार्फत अशा गाड्यांचे लायसन्स रद्द करण्यात यावे. अशी मागणी या निमित्ताने होत आहे.

**३ लाख ४४ हजार रुपयाचा मुद्देमाल–**

मोर्शी पोलिसांनी चिंचोली गवळी ते अंबाडा रोडवर नाकाबंदी करून चारही वाहन थांबवून गोवंश जनावरांसह १३ लाख ४४ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी चिंचोली गवळी मार्गावर टाटा एक्स वाहन क्र.एम.एच.३६/१८७४, वाहन क्र.एम एच ३५ के ३४८४, वाहन क्र एम एच ०१ बीआर ०४१७ तसेच वाहन क्र. एम एच ४८ टी ७५३६ या वाहनांची तपासणी करून मुद्देमाल जप्त केला. या चारही गाडीत गोवशांना अतिशय निर्दयतेने व अमानुषरित्या कोंबून कत्तलीसाठी नेत होते. याप्रकरणात चालक सुनील रामकृष्ण नेहार (३१ वर्ष रा. घोराड तालुका वरुड), मंगेश अंबादासराव सहारे (वय ४१ वर्ष रा. घोराड), गौरव गजानन गाडबैल (वय २१ वर्षे रा. घोराड) व राहुल विष्णूजी मोरे (वय २५ वर्षे रा. चांदूरबाजार) यांना ताब्यात घेतले,

# ३१७ ग्रामपंचायतींच्या कार्यकर्त्यांना लागले निवडणुकीचे वेध



## सरपंचाच्या आरक्षणाची सोडत बुधवारी तालुका कचेरीत काढली जाणार सोडत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ वर्धा :** जिल्ह्यातील ग्रामपंचायत लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने हल्ली जिल्ह्यातील ५२१ पैकी तब्बल ३१७ ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक आहे. तेथे सार्वत्रिक निवडणूक आगामी काळात घेण्यात येणार आहे. तत्पूर्वी सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत येत्या बुधवारी काढली जाणार आहे. ही प्रक्रिया जिल्ह्यातील आठही तहसील कार्यालयात होणार आहे.

जिल्ह्यातील ३१७ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, आष्टी, कारंजा, हिंगणघाट व समुद्रपूर तहसील कार्यालयात काढली जाणार आहे. त्यासाठी विशेष सभेचे आयोजन बुधवार, १८ डिसेंबरला दुपारी १२ वाजताच्या सुमारास करण्यात आले आहे. जिल्ह्यात वर्धा

तालुक्यामध्ये ५७, सेलू ३३, देवळी ४६, आर्वी २६, आष्टी २३, कारंजा ३४, हिंगणघाट ५८, समुद्रपूर ४० ग्रामपंचायतींमधील लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्याने तेथे प्रशासक नियुक्त करण्यात आले आहे. गेल्या काही महिन्यांपासून ग्रामपंचायतीचे सर्व कामकाज प्रशासकाच्या मार्गदर्शनात सुरू आहे. ग्रामपंचायत अंतर्गत करण्यात येणाऱ्या विकासकामांना एकप्रकारे खीळ बसली आहे. गेल्या एक ते दीड वर्षांपूर्वी ग्रामपंचायत निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. अचानक त्या बंद पडल्या. निवडणुकीला स्थगिती देण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर प्रशासक नियुक्त झाले तेव्हापासून ग्रामपंचायत निवडणुकीची प्रतीक्षा ग्रामीण भागाला आहे. लोकसभेची निवडणूक आटोपल्यानंतर ग्रामपंचायतीची निवडणूक होईल, अशी अपेक्षा सर्वांना होती; पण तसे झाले नाही. नुकतीच विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली. आता ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक घेण्यासाठी हालचालींना वेग आला आहे.

प्रशासकीय यंत्रणा त्याबाबतच्या कामाला लागली असून आरक्षण सोडत काढली जाणार असल्याचे कळताच गावपातळीवर निवडणूक लढवू इच्छिणारे सक्रीय झाले आहेत. त्यांच्याकडून जनसंपर्क वाढविण्यावर भर दिला जात आहे. ग्रामपंचायत निवडणुकीच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाही. सरपंचपदाचे आरक्षण काढून घेण्याच्या सूचना आल्याने सरपंचपदाच्या सारक्षण सोडतीबाबतची नोटीस जिल्ह्यातील आठही तहसील कार्यालयांतर्गत जाहीर करण्यात आली, वर्धा तालुक्यात मोठ्या ग्रामपंचायतीवर्धा तालुक्यातील ५७ ग्रामपंचायतीमध्ये प्रशासकाची सत्ता आहे. त्यातील काही ग्रामपंचायती शहरालगतच्या आहेत. लोकसंख्येने मोठ्या असलेल्या ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक नगरपरिषदेच्या निवडणुकी प्रमाणे होते व येथे निवडला जाणारा सरपंच हा महत्त्वाचा असल्यामुळे वर्धा तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीला नेहमीच महत्त्व राहीले आहे. सरपंचपदाचे आरक्षण कोणत्या प्रवर्गाकरिता निघते यावरच ग्रामपंचायत निवडणुकीच्या राजकारणाची पुढील दिशा ठरणार असल्याने आरक्षण सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बुधवार, १८ डिसेंबरला सरपंच पदाची सोडत निघाल्या नंतर राजकीय पक्षाचे नेते सरपंच पदाच्या उमेदवाराचा शोध सुरू करतील, यात शंका नाही.

# मेळघाटवरील बालमृत्यू, मातामृत्यूचा डाग दशकभरानंतर मिटला

## बालमृत्यू, मातामृत्यूच्या दरात लक्षणीय घटआरोग्य सेवा पुरविण्यास प्रशासनाचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती–** जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील मेळघाट भागावरील बालमृत्यू आणि मातामृत्यूचा डाग दशकभरानंतर प्रशासनाच्या शर्तीच्या प्रयत्नाने हटला आहे. गेल्या कालावधीत जिल्हाप्रशासनाच्या विशेष लक्षामुळे आरोग्य सेवा परिणामकारक राबविण्यात येत आहे. तसेच सेवेवर अंकुश ठेवण्यासाठी भरारी पथकांची निर्मिती करण्यात आल्याने आरोग्य सुविधा आणि सेवांच्या दर्जात सुधारणा झाली आहे.गेल्या दहा वर्षाच्या आकडेवारीचा अभ्यास करून मेळघाटात 'मेळघाट मिशन २८' राबविण्यात आले आहे. यात प्रामुख्याने जिल्हा प्रशासनाच्या मदतीने उपजिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालय, ११ प्राथमिक आरोग्य केंद्रासह विविध सुविधा, ७ फिरती आरोग्य पथक, ६ प्राथमिक आरोग्य पथक, ९३ उपकेंद्र, २२ भरानी पथकांमार्फत आरोग्य सेवा देण्यात आली. परिणामस्वरूप २०१३-१४ मध्ये ३३८ असणारा बालमृत्यू हा सन २०२३-२४मध्ये १५६वर आला आहे, तर दहा वर्षापूर्वी १४ वर असणारा मातामृत्यू दर हा ५ वर आणण्यात आरोग्य यंत्रणेला यश मिळाले आहे. महत्वाचे म्हणजे उपजत मृत्यू १३४ वरून ७९वर आणण्यात आले आहे.

मातामृत्यू आणि बालमृत्यू जाणिवपूर्वक कमी करण्यासाठी मेळघाट क्षेत्रात गरोदरमाता, स्तनदा माता, बालकांना स्त्री रोग व बालरोग तज्ज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. दर १५ दिवसांनी चक्रकार पद्धतीने ग्रामीण रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर विशेष तपासणी करण्यात येत आहे. अतिजोखमीच्या बालकांची जबाबदारी बालउपचार केंद्र आणि पोषण संवर्धन केंद्रावर सोपविण्यात आली आहे. सन २०२४-२५ मध्ये ऑक्टोबरअखेर २५ बालउपचार केंद्रामध्ये १२७ बालकांना भरती



करण्यात आले, यात ५४ मुलांमध्ये कमालीची सुधारणा झाली आहे. पोषण संवर्धन केंद्रात ऑक्टोबर अखेर ३८१ बालकांची भरती करण्यात आली, यात १९७ बालकांमध्ये सुधारणा झाली आहे. मातामृत्यू आणि बालमृत्यूला पायबंद घालण्यासाठी १ जानेवारी २०२२ पासून 'मेळघाट मिशन २८' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रसूतीच्या २८ दिवस अगोदर आणि नवजात अर्भकास २८ दिवस अंगणवाडी सेविका, आशामार्फत दैनिक भेटी देण्यात येते. यामुळे संस्थात्मक प्रसूतीची टक्केवारी ९६ पर्यंत पोहोचली आहे. मेळघाटातील अतिसंवेदनशिल गावांमध्ये आरोग्य सेवा पुराषवण्यासाठी नवसंजीवनी योजनेंतर्गत धारणी तालुक्यात १२ आणि चिखलदरा तालुक्यात १० असे २२ भरारी पथके कार्यान्वित आहेत. भरारी पथकात मानसेवी वैद्यकीय अधिकारी अखंडीत सेवा देत आहेत. त्यामुळे माता आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यात भरारी पथके मोलाचे सहकार्य देत आहेत.

मानव विकास कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर अखेर १०५ शिबीरे प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर आयोजित करण्यात आले आहे. यात तज्ज्ञांमार्फत ४३०० गरोदर माता, ६७० जोखीमग्रस्त माता, ७३७ स्तनदा माता आणि ६ महिन्यापर्यंतचे सर्व बालके, तसेच कमी वजन असलेले ७७१ बालकांची तपासणी करण्यात येऊन उपचारात्मक कार्यक्रम राबविण्यात आले. यातील सर्वांना संदर्भ सेवा पुरविण्यात आल्या आहेत.

# महसूल,पोलीस प्रशासनाच्या आश्वासननंतर प्रहारचे राहुटी आंदोलन स्थगित

## जिल्हाधिकारी कार्यालयावर लोटांगण आंदोलनाचा दिला होता इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती–** वलगाव, रेवसा, सातूर्णा, हातूर्णा, कुंड, सर्जापुर येथील पूरग्रस्त व पुनर्वसन यांच्या नागरी सुविधांची समस्या मोठ्या प्रमाणात समोर आली. या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ( इर्वीन) ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत लोटांगण घालत आंदोलन करून राहूटी आंदोलन छेडण्याचा इशारा प्रहार ने दिला होता. मात्र, प्रशासनाने याची दखल घेत मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यासंदर्भात रविवारी (दि.१५) पोलीस प्रशासनाने प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकार्यांशी चर्चा केली. त्यानंतर आंदोलन तात्पुरते थांबविण्यात आल्याचे प्रहार जिल्हाध्यक्ष छोटू महाराज वसू यांनी सांगितले. सन २००७ मध्ये वलगांव या ठिकाणी नदीला महापूर आला होता. त्यामुळे नदीकाठी असलेल्या गावातील नागरिकांच्या घरामध्ये पाणी घुसले. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शासनाने अश्या पुरग्रस्त नागरीकांचे पुनर्वसन करण्यासाठी भुखंड दिले. त्या भूखंडावर आजवर कोणत्याही प्रकारची नागरी सुविधा केलेली नाही. त्याचप्रकारे पुरग्रस्त,





पुनर्वसीतांच्या भुखंड बांधकामासाठी कोणत्याही प्रकारचा बांधकाम निधीही मिळाला नाही. त्यामुळे वलगांव येथील पूरग्रस्त, पुनर्वसन लाभार्थ्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाचे म्हणणे आहे. तसेच रेवसा येथील पुरग्रस्त पुनर्वसीतांना भुखंड मिळाला असून काही नागरिकांनी घर बांधकाम केले, तर काहींना अजूनही बांधकाम करता येत नाही. बांधकाम निधीचा फक्त प्रथम हफ्ता चाळीस हजार रुपये मिळाला आहे. त्या भुखंडावर पडीत झाड झुडपे असल्यामुळे ते तोडून साफसफाई करण्यात पैसे खर्च झालेले आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी घरासाठी पायासुद्धा बांधू शकले नाहीत. बांधकाम करण्यासाठी २००७ प्रमाणे दोन्ही गावांना निधी मंजुर केला असून त्या निधीतून घर बांधणी होत नसल्याचे प्रहारचे म्हणणे आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारची नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे तत्काळ पूरग्रस्तांच्या समस्या निकाली काढा, अन्यथा १६ डिसेंबर पासून लोटांगण आंदोलन करीत जिल्हाधिकारी कार्यालय येथे लहानापासून तर ज्येष्ठांपर्यंत राहुटी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा प्रहार ने निवेदनातून दिला होता. मात्र, प्रशासनाने आंदोलनाची तीव्रता बघता एक दिवसा आदीच म्हणजे रविवारी प्रहार पदाधिका–यांची बैठक बोलावून समस्यांबाबत चर्चा केली. यावेळी पोलिस आयुक्तालयात झालेल्या चर्चेदरम्यान डीसीपी गणेश शिंदे, सागर पाटील यांच्यासह प्रहारचे जिल्हाध्यक्ष छोटू महाराज वसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, जोगेंद्र मोहोड, अभिजित गोंडाणे, अजय तायडे, कुणाल खंडारे, प्रशांत शिरभाते, नितीन शिरभाते, सुधीर उगले, आकाश गजभिये, सचिन महल्ले यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. सोमवारी १६ डिसेंबर रोजी आमच्या मागण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात मिटींग होणार आहे. त्यामध्ये काय तोडगा निघतो हे बघून आम्ही पुढील भूमिका घेणार आहोत.आमचे आंदोलन फक्त आम्ही तात्पुरते स्थगीत केले आहे.न्याय न मिळाल्यास पुन्हा आम्ही आंदोलन करणार आहोत.

## घरपोडी करणाऱ्या चोरट्याला दागिने विकताना गुन्हे शाखेने पकडले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ हिंगणघाट–** : तालुक्यातील बोरकोणी येथे अज्ञात चोरट्याने गणपत चाफले यांच्या घरी १२ रोजी रात्री चोरी करून सोन्या चांदीचे दागिने लंपास केले होते. या घटनेची हिंगणघाट पोलिसात तक्रार करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा वर्धेने केलेल्या कारवाईत घरफोडीतील आरोपीस अटक करून २ लाख ६३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त आला. चोरटा हिंगणघाट येथे दुचाकीवर बसुन रस्त्यावर चोरीतील दागिने विकत असल्याने चोरटा पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

मिळालेल्या माहितीनुसार, गणपत चाफले यांच्या घरातील कपाटातून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दोन मंगळसूत्र व मनी असलेल्या पोथ असे सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले. या घटनेची हिंगणघाट पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांच्याकडून समांतर तपास करीत असताना १३ रोजी एक व्यक्ती सोन्याचांदीचे दागिने विकण्यासाठी आला असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांच्या पथकाला मिळाली. माहितीवरून चोरट्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने नाव विशाल चापले (२६) रा. मौजा बुरकुणी असे सांगितले.

त्याच्या ताब्यातून सोन्या चांदीचे दागिणे व गुन्ह्यात वापरलेली चोरीची दुचाकी असा २ लाख ६३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या गुन्ह्यात अधिक आरोपी असण्याची शक्यता आहे पोलिसांनी वर्तवली. ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलिस अधीक्षक डॉ. सागर कवडे, यांच्या निर्देशाप्रमाणे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, उमाकांत राठोड, प्रकाश लसुंदे, सलाम कुरेशी, राहुल इटेकर, राजेश तिवसकर, रामकिसन इप्पर, अरविंद इंगोले यांनी केली.

## दत्त जयंती निमित्त मंदिरात उसळले भाविक

### जागोजागी धार्मिक अ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**
दत्त जयंती सर्वत्र उत्साहाने साजरी करण्यात आली. या निमित्य शहरातील दत्त मंदिरांमध्ये सकाळपासून भक्तांची गर्दी दिसली.





दिगंबरा... दिगंबरा.. श्रीपाद वल्लभ दिगंबरा... श्री गुरुदेव दत्त यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमला.शहरातील दत्त मंदिरांमध्ये विविध धार्मिक आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. शहरातील काही मंदिरामध्ये शनिवारी तर काही ठिकाणी रविवारी जयंती साजरी करण्यात येत आहे.रहाटगाव येथील स्वामी समर्थ केंद्रामध्ये अखंड नामजप सप्ताह सुरू आहे. येथे रविवारी १५ डिसेंबरच्या दुपारी बारा वाजता दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला आणि सोमवारी १६ डिसेंबर रोजी गोपाल काल्याचे कीर्तन झाले. येथे सकाळी पाच ते साडेसात गुरुचरित्र वाचन, औदुंबर प्रदक्षिणा, भूपाळी आरती, स्वामी समर्थ सामुदायिक जाप, स्वामी समर्थ यांच्या मूर्तीचे पूजन ,अभिषेक, नैवेद्य आरती, पारायण सह सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.झिरी येथील दत्त मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सकाळपासून भक्तांच्या येथे दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. आज सकाळी रुद्राभिषेक झाला. त्यानंतर दत्तगुरु यांची महापूजा व आरती करण्यात आली. दुपारी चार वाजता कीर्तनकार सोपान गोडबोले यांचा दत्त जन्माचे कीर्तन झाले. दत्तगुरु जयच्या घोषाने परिसर धर्ममय झाला होता. रविवारी सकाळी आठ वाजता रुद्राभिषेक झाला आणि सोमवारी महापूजा आणि आरती होणार आहे. त्यानंतर दुपारी बारा वाजेपासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त अंबागेट, भाजीबाजार, कुंभारवाडा येथील मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आले होते. भक्तांची सकाळपासूनच मंदिरात मोठी गर्दी दिसली. गुरुदेव दत्त यांच्या जयकाराने परिसर दुमदुमला होता.

## पी.आर.पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांचा नागपूर येथे कला, डिझाईन आणि वास्तुकला ज्ञान संपादन अभ्यास दौरा

### जगविख्यात चित्रकार राजा रवि वर्मा यांच्या चित्र प्रदर्शनीला विद्यार्थ्यांची भेट





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती–** पी.आर. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने बी–आर्च प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय शैक्षणिक दौर्याचे आयोजन नागपूर शहरात केले. या दौर्याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना कला, वास्तुकला आणि डिझाईनच्या विविध पैलूंशी ओळख करून देणे, तसेच राजा रविवर्मा यांच्या कलेचे सखोल अध्ययन करणे होता.दौर्याची सुरूवात गव्हर्नमेंट आर्ट अँड डिझाईन महाविद्यालय येथे आयोजित राजा रविवर्मा यांच्या ओलोग्राफ चित्रप्रदर्शनीला भेट देण्याने झाली. राजा रविवर्मा हे भारतीय चित्रकलेचे एक अत्यंत प्रतिष्ठित नाव आहेत, आणि त्यांनी देवी–देवतांना मूर्त रूप देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. या दौर्याच्या दरम्यान त्यांच्या चित्रकलेचे प्रभाव आणि त्यातील अद्वितीयता विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यावेळी गव्हर्नमेंट आर्ट अँड डिझाईन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वनाथ साबळे आणि प्रख्यात कला तज्ञ व चित्रकार डॉ. मनीषा पाटील यांचे मार्गदर्शन देखील विद्यार्थ्यांना लाभले. राजा रविवर्मा यांच्या कलेचा अभ्यास कोणत्याही कला आणि वास्तुकला विषयाशी संबंधित अभ्यासक्रमात अनिवार्य ठरतो, आणि याच अनुषंगाने पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने हा दौरा आयोजित केला.दुसर्या टप्प्यात, विद्यार्थ्यांनी वी.एन.आय.टी. नागपूर येथील वास्तुकला विभागात विशेष पी. आर. पाटील आर्किटेक्चर महाविद्यालया च्या विद्यार्थ्यां करिता आयोजित 'बेसिक डिझाईन' या विषयावर प्राध्यापिका डॉ. सारिका बहादूरे यांचे मार्गदर्शन घेतले. डॉ. बहादूरे यांनी विद्यार्थ्यांना डिझाईनच्या तांत्रिक आणि कलात्मक बाबी समजावून सांगितल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांना डिझाईनच्या तात्त्विक आणि व्यावहारिक अंगांची माहिती मिळाली.दौर्यादरम्यान, विद्यार्थ्यांनी नागपूरच्या एक महत्त्वपूर्ण वास्तू दीक्षाभूमीला देखील भेट दिली, जी वास्तुकलेच्या दृष्टिकोनातून एक उत्कृष्ट उदाहरण आहे. दीक्षाभूमीची वास्तुशास्त्रातील महत्त्वाची भूमिका विद्यार्थ्यांना कळली आणि त्या ठिकाणी वास्तुकलेशी संबंधित महत्त्वपूर्ण गोष्टी शिकायला मिळाल्या. या शैक्षणिक दौर्याचे नियोजन प्राध्यापक डॉ.सचिन हजारे यांनी केले, आणि सहसंयोजक म्हणून प्राध्यापक भूपेंद्र जयस्वाल तसेच प्राध्यापिका तृप्ती भामकर यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले.या दौर्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य संजय देशमुख यांनी आयोजक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. हा शैक्षणिक दौरा विद्यार्थ्यांसाठी एक अनमोल अनुभव ठरला, ज्यामुळे त्यांना कला, डिझाईन आणि वास्तुकलेच्या विविध पैलूंवर सखोल दृष्टिकोन मिळाला. या प्रकारच्या शैक्षणिक दौर्यांचे आयोजन विद्यार्थ्यांचे ज्ञान आणि प्रेरणा वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

## सर्पदंशाने शेतकऱ्याचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ नंदोरी** : येथील एका शेतकऱ्याला दोन दिवसांपूर्वी सर्पदंश झाला होता. त्यांचा उपचारादरम्यान सावंगी येथील रुग्णालयात मृत्यू झाला. प्रभाकर सावरकर (६०), रा. नंदोरी असे मृतकाचे नाव आहे. प्रभाकर सावरकर यांच्या शेतात महिला मजूर कापूस वेचणीसाठी गेल्या होत्या. काही वेळाने प्रभाकर पाहणीसाठी शेतात पोहोचले. शेतामध्ये फेर फटका मारत असताना, त्यांना विषारी जातीच्या सापाने दंश केला.

ही बाब लक्षात येताच त्यांना तातडीने प्रथम येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून नंतर त्यांना सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू होते.

मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, असा आप्त परिवार आहे.

## कौंडण्यपूर विकास आराखड्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना साकडेमुख्यमंत्र्यांना विठ्ठल–रुख्मिणीची मूर्ती दिली भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती––** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर प्रथमच भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख यांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले. माता रुख्मिणीचे माहेरघर असलेल्या कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल रुख्मिणीची प्रतिकृती भेट त्यांना दिली. त्याचबरोबर श्री क्षेत्र कौडण्यपूर येथील कॉरिडॉर संदर्भात चर्चा केली असता, मुख्यमंत्री महोदयांनी कौंडण्यपूर कॉरिडॉर पूर्ण करण्यासाठी लवकरच बैठक घेऊन काम सुरू करण्याचे निर्देश दिले जाईल, असे आश्वासन रविराज देशमुख यांना दिले.

कौंडण्यपूर विकास आराखडा हा खूप दिवसांपासून प्रलंबित आहे. कौंडण्यपूर हे पर्यटनाच्या दृष्टीने एक प्रेक्षणीय



स्थळ असून या स्थळाला जागतिक कीर्ती मिळावी असे मत रविराज देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे व्यक्त केले.माता रुख्मिणीचे माहेरघर व विदर्भाची पुरातन राजधानी असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील कॉरिडॉर चा प्रश्न सातत्याने प्रशासनाकडे मांडत असून त्याला आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली. लवकरच कॉरिडॉर होणार असून त्या संदर्भात मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी आश्वासन दिल्यामुळे ते येथील विकास करतील असा विश्वास रविराज देशमुख यांनी व्यक्त केला. यावेळी भाजप नेते व विदर्भ एमआयडीसीचे अध्यक्ष किरण पातूरकर देखील उपस्थित होते.

## बिबट्याच्या हल्ल्यात वगार ठार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६** पथ्रोट–टवलार गावाला लागून असलेल्या एका केळीच्या शेत शिवारामध्ये गवळी बांधवांच्या हेटीवरील पशुंच्या कळपावर हल्ला करत बिबट्याने तेथील वगारीला ठार केले. ही घटना शुक्रवारी मध्यरात्री दोन वाजताच्या दरम्यान घडली.



गणेश शनवारे (रा. ठोकबर्डा) असे पशु मालकाचे नाव आहे.दसरा उत्सव संपताच चार्याच्या शोधात गवळी बांधव आपल्या मालकीची जनावरे घेऊन चारा उपलब्ध असलेल्या परिसरातील शेत शिवारामध्ये हेटी लावून पावसाळ्याच्या सुरुवातीपर्यंत मुक्कामी राहतात. या दरम्यान दिवसभर जनावरे चराईसाठी घेऊन फिरतात. संध्याकाळच्या वेळेस त्यांच्यापासून उपलब्ध होणारे दूध काढून ते विक्रीस घेऊन जातात. अशा प्रकारची दैनंदिन दिनचर्या सुरू राहते. १३ डिसेंबरच्या रात्री दोन वाजताच्या दरम्यान सर्व जनावरांना हेटीजवळ बांधून गाढ झोपेत असताना अचानकपणे म्हशीच्या आरडाओरडा करण्याच्या आवाजाने जागे झालेले गणेश शनवारे यांना समोर एक बिबट्या सदृश्य प्राणी

# चांदूर बाजार तालुक्यात शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयाला राहण्याच्या नियमांची वाट

## कर्तव्यावर कसुर करणाऱ्यांवर कारवाई कोण करणार? नागरिकांना पडला प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ चांदूरबाजार**

'जनतेची कामे ठरावीक वेळात व्हावे यासाठी सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यानी मुख्यालयी रहावे असा शासनाने आदेश केला असला तरी शासन चालवणारे अधिकारी कर्मचारीच असल्याने कित्येक कर्मचारी मुख्यालयाला खो देत लांब दुरवरून येजा आ करतात. त्यामुळे ह्या नियमाची सर्वस्तरावर वाट लागत असून जनतेच्या कामाचा खोळंबा होत आहे.

चांदूर बाजार तालुक्यातील शासकीय, निमशासकीय ,नगर पालीका,उपजिल्हा रूग्णालयाचे डॉक्टर व कर्मचारी,उपविभागीय अभियंता मालमत्ता व व्यवस्थापण विभाग विश्रोळी,भुमिअभीलेख अधिकारी व कर्मचारि,महाविद्यालय, शाळा, सचिव ग्रामपंचायत, तलाठी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कृषी विभाग, उपविभागीय अभियंता विज वितरण,विद्युत कर्मचारी, पंचायत समिती, तहसील कार्यालय चे तहसिलदार,नायब तहसिलदार ,पुरवठा निरिक्षक ,बोर्डी नाला कार्यालय,पाटबंधारे विभाग मध्यव व प्रकल्प उपविभागीय अभियंता व कर्मचारी, इतर क्षेत्रात कार्यरत काही कर्मचारी मुख्यालयी राहात नसल्यामुळे आम जनतेची कामे खोळंबली जातात अधिकारीस्तरा वरून कर्मचाऱ्यांची पाठराखण होत असल्याने शासकीय कर्मचारी मुख्यालयाला खो देत असल्याची ओरड होवू लागली आहे. दर पाच वर्षांनी निवडणूका येतात. एका मागून एक वेगवेगळ्या पार्टीचे सरकार सत्तेवर पहावयास मिळत आहे मात्र एक वेळ निवडणूक झाली की सत्ता बसली की परिस्थिती जैसे थे राहत




असल्याची ओरड केली जाते. चांगले दिवस येणार व असणाऱ्या समस्येचा निपटारा लागणार अशा आश्वासनांची खैरात वाटण्यात येते. मात्र राजकीय स्वार्थापोटी समस्या मार्गी लागत नाही. सर्वसामान्यांना अच्छे दिना ऐवजी वाईट दिवस पहावयास मिळत असल्याची खंत जनतेत व्यक्त केली जात आहे. कोणतेही शासन आले तरी प्रशासनावर वचक नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्वसामान्यांना तेच दिवस भोगावे लागतात. शासनाच्या सेवेत समाविष्ट होत असताना कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहून कार्य करण्याची अट असते. त्यासाठी काहींना निवासस्थान उपलब्ध करून दिल्या जाते. तर काहींना घरभाडे भत्ता दिला जातो. त्यामुळे मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. मात्र, बहुतेक विभागाचे कर्मचारी नावापुरती खोली दाखवून शहराच्या ठिकाणावरून ये-जा करतात. गावस्तरावर काम करणारे कर्मचारी तालुका स्तरावरून तर तालुका स्तरावर काम करणार जिल्हा स्तरावरून अपडऊन करत असल्याच्या चर्चा ऐकायला मिळतात काही अधिकारी तर जिल्हा स्तरावरून येजा करतात त्यामुळे कारवाई कोणावर करणार असाही गंभीर प्रश्न जनता विचारू लागली आहे त्यामुळे शासनाच्या विकास धोरणावर परिणाम होत आहे.

शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. मात्र, शासकीय कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे आवश्यक कागदपत्रे यासाठी हेलपाटे मारावे लागण्याची लाभार्थ्यांवर वेळ येते. बहुतेक अधिकारी,विविध कार्यालयाचे अभियंते,उपविभागाचे अधिकारी,रूग्णालयाचे डॉक्टर, रूग्णालयातील विविध विभागातील कर्मचारी, ग्रामसेवक, तलाठी, आरोग्यसेवक, कर्मचारी, शिक्षक व यासारखे अन्य कर्मचारी मुख्यालयी राहत नाही मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचायांची पाठराखण संबंधित अधिकाऱ्यांकडून होत असल्याचे बोलले जाते. बहुतेक तलाठी व ग्रामसेवक अथवा अन्य अधिकारी अथवा कर्मचारी दोन गावांचा कारभार असल्याचे सांगून या गावी, त्यागावी होतो, असे ही सागून वेळ मारून नेली जाते. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने शंका व्यक्त केली जाते. मुख्यालयी राहात असल्याचा देखावा करून घरभाडे उचलत असल्याची ओरड आहे. त्यामुळे शासनाच्या तिजोरीला चुना लागत आहे. एखादी तक्रारही झाली तरी स्थानिक किंवा जिल्हा पातळीवर अधिकाऱ्यांसोबत हातमिळवणी करून त्यांची पाठराखण करीत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शासनस्तरावरून अशा कर्मचाऱ्यांवर निर्बंध घातल्यास कामचुकारगिरी कमी होईल, असे नागरिकांमध्ये बोलले आल आहे. मुख्यालयी न राहता कर्तव्यावर कसूर करणार्या शासकीय कर्मचाऱ्यावर कारवाई कोण करणार असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

# टाकरखेडा ते आष्टी मार्गाची त्वरीत दुरूस्ती करा

## उपसरपंच प्रदीप शेंडे यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**दि. १६ टाकरखेडा संभू**

आष्टी ते टाकरखेडा संभू या पाच किलोमीटर रस्त्याची दुरावस्था झाली असून येथे किरकोळ अपघाताच्या घटना वाढल्या आहेत.त्यामुळे रस्त्याचे त्वरित बांधकाम करण्यात यावे या मागणीचे निवेदन उपसरपंच प्रदीप शेंडे यांच्या नेतृत्वात नागरिकांनी जिल्हाधिकारी व बांधकाम विभागाला दिले आहे.

आष्टी ते टाकरखेडा संभू या मार्गे साऊर, तळवेल, चांदूरबाजार, रामा, पूर्णानगर या मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे हा वर्दळीचा रस्ता असल्याने या रस्त्याची सध्या दुरावस्था झालेली आहे. ठिकठिकाणी खड्डे पडलेले आहेत.दरवर्षी लाखो रुपये खर्च करून या रस्त्याची तात्पुरती डागडूजी केली जाते.परंतु पक्का रस्ता बांधल्या जात नाही. त्यामुळे याची दखल घेऊन आष्टी ते टाकरखेडा संभु या पाच किलोमीटर रस्त्याची दुरुस्तीकरणे ऐवजी पक्का रस्ता बांधावा अशी मागणी जोर धरत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने १५ वर्षांपूर्वी या रस्त्याचे पक्के बांधकाम केले होते. त्यानंतर या रस्त्याची केवळ आता तात्पुरती दरवर्षी डागडुजी केल्या जाते.त्यामुळे या मार्गावर किरकोळ अपघाताच्या घटना घडत आहेत. त्यामुळे त्वरित रस्त्याचे बांधकाम करण्यात यावे या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना प्रदीप शेंडे यांनी निवेदनातुन दिले आहे.

आष्टी ते टाकरखेडा संभू रस्त्याचे कामकाजाबाबत प्रदीप शेंडे यांनी प्रत्यक्ष पाठपुरावा करून सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधी मंत्रालय पर्यंत पाठपुरावा केलेला आहे. वरील काम बजेटमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती येथे प्रस्तावित केलेले आहे .तरी पण कामाला मंजुरात मिळाली नाही.काम सुरू न झाल्यास ग्रामपंचायत उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी प्रशासनाला गावकऱ्यांच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# दिवसा घरफोड्या रात्रीच्या चोऱ्या;शहरवासी त्रस्त

## बुलेट पाठोपाठ चोरट्यांनी चक्क जेसीबी लंपास केल्याने खळबळ : पोलीस म्हणतात तपास सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ मुर्तिजापुर**

सद्यस्थितीत चोरट्यांचे मनोधैर्य एवढे वाढलेले आहे की, शहरात दिवसा घरफोड्या आणि रात्रीतून गाड्यांच्या चोऱ्या असे सत्र सुरू आहे. यावर परिपूर्ण वचक बसविण्यास किंवा चोरट्यांच्या मुस्क्या आवळण्यास पोलिसांना अद्यापही यश आलेले नाही.




गेल्या काही दिवसांपूर्वी शहरातील एका प्रतिष्ठित व्यक्तीची बुलेट चोरट्यांनी रात्री लंपास केली आहे. सदर घटनेचा तपास लागत नाही तोच अज्ञात चोरट्यांनी चक्क जेसीबी मशीन लंपास करून पोलीस विभागाला जणू आव्हान दिले आहे. चोरीच्या घटना थांबता थांबत नसून दि.१२ डिसेंबरच्या रात्री दरम्यान अज्ञात चोरट्यांनी चक्क जेसीबी मशीन घरासमोरून अज्ञात लंपास केल्याने दिवसा घरफोड्या आणि रात्रीतून चोऱ्या अशा दुहेरी कचाट्यात जनता सापडलेली असून शहरात चोरट्यांचे साम्राज्य आहे का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सदर जेसीबी चा अद्यापही सुगावा लागलेला नसून पोलीस विभागाकडून तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले. याबाबत प्राप्त माहितीनुसार शहरातील पांडे लेआउट येथील रहिवासी असलेले हेमंत ज्ञानेश्वर पिंपळे यांचा ठेकेदारीचा व्यवसाय असून त्यांच्याकडे त्यांची जेसीबी ३ डीएक्स क्र. एम.एच. एझेड ५२७६ आहे. गेल्या दोन-तीन महिन्यापासून कामे नसल्याने सदर जेसीबी घरासमोर उभी असताना दि. १२ च्या रात्री दरम्यान अज्ञात चोरट्यांनी सदर जेसीबी लंपास केली. जेसीबी लंपास केल्याची घटना ही तालुक्यात पहिल्यांदाच घडल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. सदर जेसीबी मशीनची किंमत २४ लाखाच्या घरात असून ती घरासमोर उभी असताना अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. त्याचप्रमाणे शहरातून सदर जेसीबी चोरी होण्याच्या तीन-- चार दिवस पहिले बुलेट देखील अज्ञात चोरट्यांनी लंपास केली आहे. याबाबत अद्याप कुठलाही सुगावा लागलेला नाही. शहर पोलिस स्टेशनला हेमंत पिंपळे यांच्या तक्रारीवरून कलम ३०३ (२) बीएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश सूर्यवंशी करीत आहेत.

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ स्मार्ट हॅकेथॉन स्पर्धा २०२४

# शेतकऱ्यांच्या कृषी जीवनात आर्थिक व्यवसायाचे नवचैतन्य निर्माण करणारे संशोधन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ दर्यापूर**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर्गत विद्यापीठाच्या इन्क्यूबेशन विभागाच्या वतीने आयोजित स्मार्ट हॅकेथॉन २०२४ अमरावती विभागीय स्पर्धा संपन्न झाली . या स्पर्धेमध्ये एकूण १३० प्रकल्पांसाठी अमरावती विभागातून ५०० स्पर्धकांनी भाग घेतला . या स्पर्धेसाठी विभागाद्वारे गठीत स्पर्धा मूल्यांकन कमेटीने निवड केलेल्या आठ स्पर्धकांना उत्तेजनार्थ पुरस्कारांनी गौरविण्यात आले . स्पर्धा आयोजन विद्यापीठ इन्क्यूबीशन विभागा द्वारे प्रस्तावित कंपनी निर्माण व स्टार्ट अप फंडासाठी मूल्यांकन समिती द्वारे पहिल्या तीन स्पर्धकांची निवड करण्यात आली . यामध्ये प्रथम पुरस्कार वेदांत भेंडकर यांना बोन लिंक संशोधनासाठी , द्वितीय पुरस्कार प्रा . गजानन भारसाकळे यांना अग्रीटेक व फूड या शिर्षकाखाली लाकडा ऐवजी गाईच्या शेणाच्या गोवर्या एक पर्यावरण पूरक उर्जा स्तोत्र या संशोधना करीता तथा तृतीय पुरस्कार अभिषेक मोडक व



अर्जुन माहोरे यांना ड्रोन विक्स या संशोधनाकरीता पुरस्कार वितरण समारंभाचे अध्यक्ष डॉ मिलिंद बारहाते कुलगुरु संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांचे शुभ हस्ते प्रदान करण्यात आले . बाभूळगांव - अकोला येथील शिवाजी अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयात सिव्हील इंजिनिअरींग विभागात कार्यरत प्रा. गजानन भारसाकळे यांनी दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे ) परिसरात स्वतः स्थापन केलेल्या गोरक्षण संस्था स्थळावर गाईच्या शेणात गोमूत्र , सहज उपलब्ध दोन नैसर्गिक वनस्पती व इतर दोन घटक वापरून हे संशोधन कार्य केले असून याच विषयांवर त्यांनी केंद्र शासनाच्या मुंबई कार्यालयात पेंटेंट मिळविण्यासाठी नोंदणी केलेली आहे . तसेच राजस्थान राज्यातील जे जे टी यु विद्यापीठात ते याच विषयात पी एच डी सुध्दा करीत असून लवकरच त्यांचे द्वारे लाकडा ऐवजी पर्यावरण पूरक गाईच्या शेणाची गोवरी हा ऊर्जा स्तोत्र पर्याय सिद्ध करणारा संशोधन प्रबंध प्रसिद्ध होणार असून कृषी व शेतकरी जीवनात व्यवसायाचे आर्थिक नवचैतन्य निर्माण करणारे हे कार्य ठरणार असल्याचे मत कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केलेले आहे . हे संशोधन विद्यापिठातील इन्क्यूबेशन सेंटर द्वारे कंपनी गठन व स्टार्ट अप फंडासाठी निवड झाली असल्याने प्रा. भारसाकळे यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे . अकोला येथे महाराष्ट्रातील ख्यातनाम श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे एकमेव इंजिनिअरिंग कॉलेज असून महाविद्यालय स्थापनेपासून गेल्या ४१ वर्षात कंपनी गठन व स्टॉर्ट अप फंडासाठी निवड झालेला हा पहिला संशोधन प्रकल्प म्हणून महाविद्यालय इतिहासात नोंद करणारा असल्याने हि बाब या निमित्याने अधोरेखांकीत झाली आहे . तसेच विद्यापीठाचे गाडगेबाबा सामाजिक कार्य व पर्यावरण हे दोन्ही प्रतिष्ठेचे पुरस्कार एकत्रित प्राप्त एकमेव व्यक्ती म्हणूनही त्यांची विद्यापीठात नोंद झालेली आहे .या स्पर्धेच्या पुरस्कार वितरण मंचावर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ मिलिंद बारहाते यांचेसह विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ रविंद्र कडू , कुलसचिव डॉ अविनाश असणारे, माजी प्र - कुलगुरु डॉ प्रसाद वाडेगावकर तथा इन्क्युबेशन विभागाच्या विभाग प्रमुख डॉ स्वाती शेरेकर व विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ विलास नांदूरकर यांची उपस्थिती होती . एकूण दहा विषय वर्गवारीत घेण्यात आलेल्या या संशोधनरूपी नवकल्पना सादरीकरण दरम्यान कुलगुरु महोदयासह सर्व मान्यवरांनी स्पर्धेतील संपूर्ण चमूंच्या स्टॉलवर भेट देऊन , सर्व संशोधक स्पर्धकांशी दिर्घकाळ चर्चा व संवाद साधला हे या स्पर्धा आयोजनातील प्रमुख वैशिष्ट ठरले . समाज जीवनाचा सर्वांगीण विकास साधणारे शिक्षण व त्यासाठी लागणारी संशोधन वृत्ती प्रेरणा यासाठी हे स्पर्धा आयोजन अतीशय उपयुक्त ठरत असल्याने आयोजक अभिनंदनास पात्र असल्याचे गौरव उद्गार कुलगुरु महोदयांनी या प्रसंगी काढले . कुलसचिव डॉ अविनाश असनारे यांनी येणार्या काळातील नव शिक्षण व नवसंशोधन या काळाच्या गरजेवर तथा वास्तविकतेवर भाष्य करीत उपस्थित संशोधकांना आपल्या ओजस्वी वकृत्व शैलीने मोलाचे मार्गदर्शन केले . समारंभाचे प्रास्ताविक डॉ स्वाती शेरेकर , कॉल फॉर सीड फंड बाबत माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव तथा संचलन व आभार प्रदर्शन विभाग व्यवस्थापक अमोल हिरुळकर यांनी केले . संपूर्ण दिवसभर सुरु असलेल्या स्पर्धा नियोजनात इन्क्यूबेशन विभागाच्याआयोजन समितीतील सर्वांनी अथक परीश्रम घेतले .

# अमरावती केंद्रावरील राज्य नाट्य स्पर्धेचे उद्घाटन संपन्न


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६३ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे उदघाट्न अमरावती येथे *अरविंद लिमये नाट्यगृह, सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय* शुक्रवार दिनांक १३ डिसेंबररोजी संपन्न झाले.

आजपासून सुरु झालेली ही स्पर्धा २६ डिसेंबर पर्यंत होणार आहे . या स्पर्धेत रोज संध्याकाळी सात वाजता नाटकाचे प्रयोग सादर होणार आहेत.

या स्पर्धे करिता शासना मार्फत आलेले सन्माननीय परीक्षक प्रा. डॉ. शशिकांत चौधरी ( कोल्हापूर ), श्री. आबासाहेब शिंदे ( औरंगाबाद ) आणि कीर्ती मानेगावकर ( नागपूर ) या उदघाटन समारंभाला उपस्थित होते. अमरावती जिल्हा मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष ऍड. चंद्रशेखर डोरले यांचे अध्यक्षतेखाली आणि जेष्ठ रंगकर्मी नाना देशमुख व श्री राजेंद्र पांडे यांचे प्रमुख उपस्थितीत हा उदघाटन सोहळा नटाराज पूजन आणि दीप प्रज्वलन करून संपन्न झाला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात चंद्रशेखर डोरले यांनी परीक्षकांचे स्वागत करून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे संचलन आणि





आभार प्रदर्शन अनिता काळे यांनी केले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे. या स्पर्धेमध्ये एकूण १४ संघांचा सहभाग आहे. अमरावती शहर व संपूर्ण जिल्ह्यातील संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. राज्य नाट्य स्पर्धेतील नाटक पाहण्यासाठी नाममात्र रु-१५/- व १०/- तिकीट ठेवण्यात आलेलं आहे. उदघाटना नंतर लगेचच मोठ्यांचा सेक्स फियर हे नाटक रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात सादर करण्यात आले.

शनिवारी सादर होणारे नाटक अपरिहार्य कारणाने रद्द झाले असून रविवारी पूर्वनियोजित प्रयोग सादर होईल.राज्यनाट्य स्पर्धेतील सर्व नाटकांना जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित राहावे आणि हौशी रंगकर्मींचा उत्साह वाढवावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केलेले आहे.

वातानुकुलीत आणि सुसज्ज सभागृहात वेळेवर उपस्थित राहून विविध नाटकांचा आस्वाद घ्यावा आणि कलावंतांचा आनंद वाढावावा अशी विनंती स्पर्धा समन्वयक विशाल फाटे आणि सहसमन्वयक कोमल तायडे यांनी केली आहे.

# जिरे माळी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

## हजारो समाज बांधवांची उपस्थिती : ५०० उपवर युवक युवतींचा सहभाग व परिचय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ अमरावती**

जिरेमाळी समाज बहुद्देशीय संस्था अमरावती व अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दरवर्षी प्रमाणे यावर्षी जिरे माळी समाजातील सर्वात मोठा राज्यस्तरीय उपवर वधू-वर परिचय मेळावा नुकताच अभियंता भवन अमरावती येथे पार पडला या मेळाव्याच्या निमित्ताने अनुबंध पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले जिरे माळी समाज बांधवांचे आकर्षण असलेल्या या उपवर युवक युवतींची नोंदणी या अनुबंध पुस्तकात असून हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत मेळावा पार पडला.





महात्मा जोतिबा फुले सावित्रीबाई फुले राजा सगर सावता माळी या महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून मेळाव्याला सुरवात करण्यात आली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानद संस्थेचे अध्यक्ष संभाजी पगारे उदघाटक उद्योजक चंद्रकांत बागुल प्रमुख उपस्थिती कैलाश तानकर, दिगंबर गुंजकर, ज्ञानदेव चव्हाळे, प्रा कैलास नागोलकर,दिनकर ताणकर, शालिनी बुंदे, बहुद्देशिय संस्थेचे मार्गदर्शक शिवाजी नांदगावकर, अविनाश भोजापूरे, प्रकाश मारोटकर, वासुदेव बोराडे, ए टि पाटील, श्रीकृष्ण बनसोड, नंदेश अंबाडकर, विजय मडके, जि.प सदस्य मीना भोणे. यांचे प्रमुख मार्गदर्शक डॉ नलिनी बोरुडे, सह जिरे माळी समाजातील लोकप्रतिनिधी, नामवंत डॉक्टर, प्रतिष्ठित नागरिक, उद्योजक, यांची या मेळाव्याला प्रामुख्याने उपस्थिती होती

मेळाव्यासाठी सर्व नोंदणी झालेल्या उपवर-वधू यांची छायाचित्रांसह एकत्रित माहिती असलेली अनुबंध या पुस्तकात नोंदणी केलेल्या वर वधुनी आपला परिचय मेळाव्यात आपल्या पालका सोबत परिचय दिला कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिरे माळी समाज बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुनील मारोटकर व संचालन प्रा काशिनाथ लाहोरे यांनी केले तर आभार मधुकर कोळसे यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिरेमाळी समाज बहुद्देशीय संस्थेचे पंकज सपकाळ, डॉ प्रमोद लोमटे, कमलेश नांदगावकर, गजानन तानकर, अशोक रुमने, विनोद नागोलकर, गणेश काळेकर, राजेंद्र तरास, नरेंद्र मारोटकर, सुरेश मारोटकर, अश्विनी परसंनकर, सौ दिपीका बोरकर, वर्षा काळेकर, इत्यादींनी परिश्रम घेतले

**वधू वर परिचय मेळाव्यातुन समाजाला दिशा मिळते**

जिरे माळी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा हा समाजाला दिशा देणारा असून राज्यात व राज्याबाहेर असलेला समाज बांधव या परिचय मेळाव्याच्या माध्यमातून माहिती होते आणि यातून विवाह जुळून येतात असे प्रतिपादन जिरे माळी समाजाचे युवा नेते प्रकाश मारोटकर यांनी केले.

# महायुतीत अमरावतीच्या आमदारांना दुसऱ्यांदा मंत्रिपद नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ अमरावती**







अमरावतीकरांचा हिरमोडमहायुतीचं सरकार २०१९ मध्ये राज्यात आलं असताना अमरावती जिल्ह्यात काही काळ प्रवीण पोटे आणि काही काळ डॉक्टर अनिल बोंडे यांना मंत्रिपद मिळालं होतं. उद्धव ठाकरे यांचं सरकार पाडल्यानंतर महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात अमरावती जिल्ह्यातून महायुती सोबत असणाऱ्या तीन पैकी एकाही नेत्याला संधी मिळाली नसताना आता सलग दुसऱ्यांदा अमरावती जिल्ह्यात निवडून आलेल्या महायुतीच्या सात पैकी एकाही आमदाराला मंत्रिमंडळात स्थान मिळालं नाही.

**महाविकास आघाडी सरकारमध्ये दोन मंत्री**

२०१९ मध्ये राज्यात काँग्रेस शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यावर अमरावती जिल्ह्यातील तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर आणि अचलपूर विधानसभा मतदारसंघातून विजयी झालेले प्रहारचे बच्चू कडू यांना मंत्रिमंडळात स्थान मिळालं होतं. यशोमती ठाकूर या अमरावती जिल्ह्याच्या तर बच्चू कडू यांना अकोला जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. आज महायुती सरकारमध्ये अमरावती जिल्ह्यातील महायुती मध्ये असणाऱ्या सात पैकी एकाही आमदाराला मंत्रिमंडळात संधी देण्यात आली नाही.

**रवी राणा आणि सुलभा खोडके यांच्या नावाची होती चर्चा**

निवडणुकीचा निकाल जाहीर झाला तेव्हापासून बडनेरा विधानसभा मतदारसंघातून सलग चौथ्यांदा विजयी झालेले आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यकर्त्यांकडून भाऊ मंत्री होणारच असं सांगितलं जात होतं. समाज माध्यमांवर रवी राणा मंत्री होतील आणि त्यांचं अमरावतीचे पालकमंत्री पद देखील निश्चित असल्याच्या पोस्ट दिवसातून शेकडो वेळा समाज माध्यमांवर यायच्या. अमरावती शहरातील विविध चौकांमध्ये गत अनेक दिवसांपासून रवी राणा भावी मंत्री असे पोस्टर देखील लावण्यात आलेत. असं असताना आज राज्य मंत्रिमंडळात रवी राणा यांना स्थान मिळालं नाही. आमदार रवी राणा यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळावं यासाठी युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या वतीने अंबादेवी मंदिरात महाआरती देखील करण्यात आली विशेष म्हणजे स्वतः आमदार रवी राणा यांनी शुक्रवारी मुंबईत दादर येथील हनुमान मंदिरात मंत्री पदासाठी पूजा केली. असं असतानाही रवी राणा यांना मंत्रिमंडळात स्थान मिळालं नसल्यानं युवा स्वाभिमान पक्षाच्या कार्यकर्ते निराश झालेत. अमरावती जिल्ह्यातील आठ पैकी सात विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार निवडून आलेत यापैकी अमरावती विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये असणाऱ्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून विजयी झालेल्या सुलभा खोडके यांना मंत्रिमंडळात स्थान मिळेल अशी अपेक्षा अनेकांना होती. असं असताना सुलभा खोडके यांना देखील मंत्रिमंडळात स्थान मिळालं नाही.

# स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथे दत्त जयंती सप्ताहाचा समारोप

## श्री स्वामी समर्थ व श्री गुरुदेव दत्तांचा जयघोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ अमरावती**



दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा या भजनाप्रमाणे दत्त जयंती व श्री स्वामी समर्थ अखंड नामजप सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सात दिवस चालणाऱ्या या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रम घेऊन स्वामी समर्थांची पालखी व ग्रंथदिंडी काढण्यात आली होती. पालखीने संपूर्ण वातावरण भक्तिमय होऊन सर्व परिसर दुमदुमला होता. टाळ, मृदुंगाच्या गजरात स्वामी समर्थ चा जयघोष करण्यात आला. स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित आरोग्य सेवा कॉलनी रहाटगाव येथे स्वामी समर्थ सेवा केंद्रात ९ डिसेंबर ते १६ डिसेंबर दरम्यान श्री दत्त जयंती व अखंड नामजप सप्ताह घेण्यात आला होता. सप्ताहाची सांगता पालखी काढून करण्यात आली. यावेळी भव्य शोभा यात्रेने रहाटगाव परिसर भक्तिमय झाला होता. सप्ताहाच्या समारोपात अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार , डीआयजी साहेब,तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मंडळींनी स्वामींचे दर्शन घेऊन आपली उपस्थिती दर्शविली होती .या सप्ताहात डॉक्टर कृष्णराव बोरखडे, निर्मला बोरखडे, स्वाती बोरखडे, पांडुरंग पारतकर, छाया पारतकर,राजेंद्र ठाकरे ,साधना ठाकरे, नयनाताई देशमुख,रमेश भाऊ अंबाडकर, मधुकर सुरांदसे, एन एम देशमुख, दीपकराव देशमुख, चंद्रकांत मेहरे, सुधाकर ताथोड, अमोल महलले, प्रणव माहुरे ,आकाश बांते, छगन डोईजड ,सुधाकर पाचघरे ,दिलीपराव देशमुख ,प्रतीक जीभ काटे, प्रदीप कोल्हे ,प्रफुल्ल सहारे, देशमुख ,प्रदीप शिंगोटे, शशी अर्डक, पौर्णिमा गभणे, दिपाली शहारे, हर्षा धर्माळे,शीतल धवक,राशी भाटिया, चित्रा जाधव, काकासाहेब मोरे ,राजेश तोमर, अक्षय काटोलकर, प्रशांत के राम, अशोक गाडखे ,राजेश रोंगे, गायकवाड साहेब ,पंकज देशमुख, बाळासाहेब खारोडे, मिलिंद देशमुख, सुभाष रंगे, राजूभाऊ खारोडे, सुनील ठाकरे, मंगेश रोंगे, गजानन गांजरे, त्रिंबक नागपुरे, गजानन उके, अभिजीत काळे ,ओम देशमुख, अनिल निस्ताने ,ज्ञानेश्वर चेंडे, अक्षय राऊत ,धनराज डहाके, निलेश कोठे, परणकर साहेब, दिघडे साहेब, रंजीत भुंबर ,लकी गभणे, कार्तिक चौबे यासह परिसरातील संपूर्ण भाविक भक्त मंडळी उपस्थित होते.

# मेळघाटात आमदार काळें च्या हस्ते आठ जीवनदायी रुग्णवाहीकांचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ धारणी**



कुपोषणग्रस्त मेळघाटातील आदिवासी रुग्णांना यापूढे त्वरित संदर्भ सेवा मिळवून देण्याचा उदात्त दृष्टिकोन जपून आरोग्य खात्याकडून पुरविण्यात आलेल्या एकूण आठ रुग्णवाहीकांचा लोकार्पण सोहळा धारणी तालुक्यातील कळमखार येथे नुकताच मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांच्या शुभहस्ते हिरवा झेडा दाखवून घेण्यात आला.

त्यामुळे मेळघाटातील तमाम आदिवासी रुग्णांना नक्कीच मोठा दिलासा मिळणार असल्याची सुखद वार्ता आहे. धारणी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र कलमखार येथे आयोजित कार्यक्रमादरम्यान आमदारांनी या आठ अत्याधुनिक जीवनदायी रुग्णवाहीकांच लोकार्पण केल. त्याप्रसंगी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर ( भाप्रसे ), तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.तिलोत्तमा वानखडे, बीडीओ जीवनलाल भीलावेकर, सहाय्यक बीडीओ मयुर दलाल, कलमखार प्रा.आ. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सातारकर, प्रतिष्ठित नागरिक रसीकभाई पटेल, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्रीपाल पाल, पंचायत समीतीचे माजी सभापती अशोक मावस्कर, सामाजिक कार्यकर्ते पांडूरंग बरडे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक रोहीत पाल, सेवानिवृत्त पशुसंवर्धन अधिकारी हिरालाल जावरकर, नवनीत गंगराडे, अमोल सैदाणे इत्यादींसह इतर मान्यवर मंडळी उपस्थित होती.

मेळघाटातील आरोग्य सेवांच बळकटीकरण व्हाव, रुग्णांना हमीचा औषधोपचार व संदर्भ सेवा तसेच आरोग्य सोयीसुविधा मिळवून देण्यासाठी महायुती-भाजप सरकार पूर्णतः कटिबद्ध असून त्याच पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित महायुती-भाजप आमदार केवलराम काळे हे देखील अतिशय संवेदनशील दिसून येत आहेत. मेळघाटातील आरोग्य व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी राज्य सरकार तर्फे जिल्हा परिषदेच्या आरोग्य खात्याकडे एकूण आठ रुग्णवाहीका हस्तांतरित करण्यात आल्या असून या आठही रुग्णवाहीका धारणी तालुक्यातील कार्यरत प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांसाठी धावणार आहेत.

आमदार केवलराम काळें यांच्या शुभहस्ते या आठही जीवनदायी रुग्णवाहीकांच लोकार्पण कलमखार येथे आयोजित कार्यक्रमातून झाले. त्यामुळे कुपोषणग्रस्त मेळघाटातील आरोग्य व्यवस्था मजबूत करण्यासोबत रुग्णांना तातडीची संदर्भ सेवा पुरवून रुग्णांना जीवदान देण्यासाठी संबंधित रुग्णवाहीका धारणी तालुक्यातील संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांवर संदर्भ सेवेसाठी तैनात होणार आहेत.

डोंगरावर राहणार्या आदिवासींना आरोग्य केंद्रामधून हमीची संदर्भ सेवा मिळवून घेण्यासाठी आमदार केवलराम काळे हे प्रयत्नशील दिसून येत आहेत. मेळघाटातील आरोग्य सेवांच बळकटीकरण व अत्याधुनिक सोई सुविधेंतर्गत पुरविण्यात येणारी जीवनदायी रुग्णवाहीका या सर्वसामान्य माणसांच्या दारापर्यंत पोहोचत स्वस्थ व सशक्त सुदृढ समाज घडेल यात तिळमात्र देखील शंकाच नाही!

# पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या शुभहस्ते अटल दौड हाफ मॅरेथॉन स्पर्धाचा टीझर लॉन्च

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १६ अमरावती**

माजी पंतप्रधान भारतरत्न स्व अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने अटल दौड हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे टीझर लॉन्च पद्मश्री श्री प्रभाकरराव वैद्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

अटल दौड मॅरेथॉन स्पर्धा' ही तीन वर्षांपासून अंबानगर मध्ये घेतली जात आहे. अतिशय उत्साही वातावरणात ही स्पर्धा पार पडते. यंदा या स्पर्धेमध्ये ५ हजार स्पर्धक भाग घेण्याची शक्यता आहे. या स्पर्धेमुळं भारतीय खेळाडूंच्या उत्साहात आणि चैतन्यात नेहमीच भर पडली आहे. अमरावती मधील क्रीडा प्रेमींनी या मॅरेथॉन मध्ये सहभागी होऊन एकूणच अमरावतीचं आरोग्य आणि एकात्मता अबाधित राखण्यात या स्पर्धेचा महत्त्वाचा वाटा असल्याचं, मत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी केलं .

यावेळी संपूर्ण मॅरेथॉन स्पर्धाची माहिती मुख्य आयोजक तुषार भारतीय यांनी सांगितली . टीझर लॉन्च सोहळला प्रा रवींद्र खांडेकर , प्रा माधुरी वैद्य , माजी महापौर चेतन गावंडे , प्रशांत शेंगोकर , प्रा अतुल पाटील , सचिन मोहोड , राजेश जगताप , मंदार नानोटी , देव कुलकर्णी , जितेश भुजबळ प्रामुख्याने उपस्थित होते.

# बीड व परभणीच्या घटनांवर राज्यातील जनतेत तीव्र संताप, सरकारने उत्तर द्यावे : नाना पटोले

## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधीपक्ष आक्रमक, ईव्हीएम व बीड, परभणीतील मुद्द्यांवर विधानभवनच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ नागपूर**

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी परभणी व बीड मधील घटनांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. संविधानाची विटंबना व सरपंचाची निघृण हत्या या दोन्ही घटना भाजपा सरकार आल्यानंतर घडल्या आहेत. परभणीत एका आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला आहे. या घटना अत्यंत गंभीर असून आंबेडकरी अनुयायी व राज्यातील जनतेत प्रचंड संताप आहे. सरकारने या मुद्द्यांवर उत्तर द्यायची तयारी दाखवावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभेत परभणी व बीडच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर सरकारच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्ष ज्या दिवशी चर्चा करण्यास सांगतील त्या दिवशी चर्चा करू असे आश्वासन दिले. त्यानंतर विधीमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांना किडनॅप केल्याची माहिती पोलिसांना होती पण देशमुख यांची अत्यंत निघृण पद्धतीने हत्या करण्यात आल्यानंतर पोलीस सक्रीय झाले. भाजपा सरकार आल्यानंतर दलित व बहुजन समाजावर अत्याचार केले जात आहेत का? ईव्हीएम सरकारने राज्यात राजकीय हत्यासत्र सुरु केले आहे का? असे प्रश्न पटोले यांनी उपस्थित केले.



परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी यांना कोठडीत असताना पोलिसांनी प्रचंड हालहाल करून मारण्यात आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले असून ही सरकार प्रायोजीत हत्या आहे. याप्रकरणी सरकारवरच हत्येचा गुन्हा दाखल केला पाहिजे अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.

परभणीच्या मुद्द्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, संविधानाची विटंबना केल्याप्रकरणी पवार नावाच्या इसमाला पोलिसांनी अटक केली असून तो मनोरुग्ण असल्याचे सांगितले जाते परंतु तो व्यक्ती बांग्ला देशातील हिंदूंवरील अत्याचार प्रकरणी काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी झाला होता. सरपंच संतोष देशमुख सुद्धा हिंदूच आहे, त्यांचे हातपाय कापले, मृत्यूनंतर त्यांच्या शरिरावर आरोपी नाचले, त्यांना काय म्हणणार. बांग्ला देशातील हिंदू सुरक्षित नाहीत म्हणता मग भारतातील हिंदुंच्या संरक्षणाचे काय, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. परभणी व बीडचे प्रकरण मारकडवडीच्या ईव्हीएम विरोधातील मुद्द्यावरून लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न तर नाही ना अशी शंका येते असेही नाना पटोले म्हणाले.

माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या बंगल्यावर वैभव नावाच्या मुलाला किडनॅप करून ठेवले आहे. ९ कोटी रुपयांसाठी त्याला किडनॅप केले असून त्याच्याकडून ४.५ कोटी रुपये वसून केले आहेत, बाकीच्या ४.५ कोटी रुपयाच्या वसुलीसाठी त्याच्यावर अत्याचार केले जात आहेत. ही कसली वसुली आहे ? एवढे पैसे चव्हाणांकडे आले कुठून, असा प्रश्नही नाना पटोले यांनी विचारला आहे.

विधानसभेच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यावर आंदोलन केले. ईव्हीएम हटाव व परभणी तसेच बीडच्या मुद्द्यांवर यावेळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.